वर्ष ५८ वे । अंक १४ । पृष्ठे ६ । किंमत २ रूपये। मंगळवार, २९ जुलै २०२५
PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com epaper.satyaprabha.com




# दैनिक सत्यप्रभा

बातम्यांसोबत विचार देणारे

**स्टार गोल्ड मॅन्युफॅक्चरींग ॲन्ड छिल पॉलीश**

आमच्या येथे सोन्याचे दागिने रेडीमेड व ऑर्डर प्रमाणे तयार करून मिळतील तसेच जुने दागिने पॉलीश करून, रिपेअरींग करून दिले जातात. सोने-चांदीचे कोणतेही दागिने अर्जट पॉलीश करून मिळेल. सोन्याचे ऑर्डर चे कोणतेही दागिने अर्जट तयार करून मिळेल. डायमंड चे कोणतेही दागिने कॉम्प्युटराईज लेजर मशिन ने जोडले जाते.

पत्ता : ग्राऊंड फ्लोर, कृष्णा बिल्डींग, शिव मंदीर समोर, किल्ला रोड, सराफा बाजार, नांदेड - 431604 (महाराष्ट्र). मो. 7841826158, (व्हॉटसॲप)7506116854

## लष्कराच्या 'ऑपरेशन महादेव'ला मोठे यश
## १७ दिवसांनंतर मास्टरमाइंड हाशिम मुसाला कंठस्नान

# पहलगाम हल्ल्याचा बदला, तीन दहशतवाद्यांचा खात्मा!

वृत्तसंस्था। श्रीनगर

संसदेत ऑपरेशन सिंदूरवर आज चर्चा सुरू झाली. तर दुसरीकडे देशात पवित्र असा श्रावण महिना सुरु झाला आहे. त्याच वेळी जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दलांनी ऑपरेशन महादेव राबवून पहलगाम हल्ल्याचा मुख्य सूत्रधार हाशिम मुसा, आदिल हुसैन ठोकर आणि अली उर्फ तल्हा भाई या तिघांना कंठस्नान घातले. हाशिम मुसा हा या हल्ल्याचा मास्टरमाईंड असून त्याने हा हल्ला कसा घडवायचा याचा कट रचला होता आणि त्याची अंमलबजावणी केली होती. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. या भ्याड हल्ल्यात एकूण २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी मोठ्या प्रमाणात मोहिम सुरु करण्यात आली होती. त्यातच या हल्ल्याच्या ९७ दिवसांनंतर आज भारतीय सैन्याने 'ऑपरेशन महादेव' अंतर्गत प्रत्युत्तरात्मक कारवाई करत तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. ही चकमक सोमवारी श्रीनगरमधील लिडवास परिसरात झाली. याबाबत चिनार कॉर्प्सने माहिती दिली असून, ही कारवाई हलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी नेटवर्कविरोधात पान २ वर



**आठवड्यापूर्वी लागला होता सुगावा**

- संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पहिल्यांदाच दहशतवाद्यांनी चिनी अल्ट्रा कम्युनिकेशन सेट पुन्हा सक्रिय केला. तेव्हा सुरक्षा दलांना एका आठवड्यापूर्वी श्रीनगरच्या दाचीगाम जंगलात अतिरेकी असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर दहशतवाद्यांना शोधण्यासाठी सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू केली.
- आज सकाळी ११:३० च्या सुमारास, २४ राष्ट्रीय रायफल्स आणि ४ पॅरा युनिटच्या सैनिकांच्या तुकडीने प्रगत उपकरणांचा वापर करून दहशतवाद्यांचे ठिकाण शोधून काढले आणि तिथे उपस्थित असलेल्या तिन्ही दहशतवाद्यांना ठार मारले. वृत्तसंस्था पीटीआयनुसार, लष्कराच्या अधिकाऱ्यांनी पुष्टी केली आहे की मारला गेलेला दहशतवादी हाशिम मुसा होता.
- उर्वरित दोन दहशतवाद्यांपैकी एकाचा २०२४ मध्ये सोनमर्ग बोगदा प्रकल्पावरील हल्ल्यात सहभाग असल्याचे सांगितले जात आहे. मंगळवारी लष्कराकडून ऑपरेशन महादेवची माहिती दिली जाऊ शकते. या भागात सुरक्षा दलांची तैनाती वाढवण्यात आली आहे.

### दोन पाकिस्तानी


पहलगाम हल्ल्यानंतर आदिल, मुसा आणि अली हे पहलगाम हल्ल्याचे तीन गुन्हेगार असल्याचे स्पष्ट झाले होते. घटनेनंतर दोन दिवसांनी अनंतनाग पोलिसांनी तीन दहशतवाद्यांचे स्केच जारी केले होते. या तिघांपैकी मुसा आणि अली हे पाकिस्तानमधील असून त्यांच्यावर प्रत्येकी २० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. तर आदिल हुसैन हा अनंतनागचा रहिवासी होता.

### सलग दोन दिवस राबवली मोहीम

दहशतवाद्यांची संभाव्य ठिकाणांची खात्रीशीर माहिती मिळवण्यासाठी स्थानिक बकरवाल समूह आणि गस्तीवर असलेल्या युनिट्सकडून मदत घेण्यात आली. त्यानंतर परिसरात २४ राष्ट्रीय रायफल्स आणि ४ पॅराच्या स्पेशल युनिट्सला तैनात करण्यात आले. सलग दोन दिवस शोधमोहीम सुरू होती. अखेर सोमवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास दहशतवाद्यांशी चकमक झाली.

### कारवाई थांबवण्यामागे कोणताही बाह्य दबाव नव्हता
# ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानला पाणी पाजले

**लोकसभेत राजनाथ सिंह यांनी दिले प्रत्येक शंकेचे उत्तर**



वृत्तसंस्था। नवी दिल्ली


जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला. या भ्याड हल्ल्यामागे पाकिस्तान आहे हे समजल्यानंतर भारताने सहा आणि सात मे रोजी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला चोख उत्तर दिले. पाकिस्तानला पाणी पाजले. ही फक्त कारवाई नव्हती तर दहशतवादाविरोधात आपण उचललेले कठोर पाऊल होते, असे सांगून.देश की सेना शेर है, अशा शब्दांत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लष्कराचे कौतूक केले. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारत-पाकिस्तान दरम्यान युद्धबंदीतील मध्यस्थीचा दावाही साफ फेटाळून लावला. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरवर आजपासून लोकसभेत चर्चा सुरु झाली. राज्यसभेत मंगळवारी चर्चा होणार आहे. आज पहिल्या दिवशी सत्ताधारी आणि विरोधक या संवेदनशील विषयावर आमनेसामने आले. राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर वातावरण तापले आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लोकसभेत चर्चेची सुरुवात करताना ऑपरेशन सिंदूरमागील भूमिका आणि त्याचे परिणाम सविस्तरपणे सभागृहासमोर मांडले. विरोधकांनी गेल्या काही दिवसांत भारतीय लष्कराच्या या अभियानावर उपस्थित केलेल्या विविध आरोपांना सडेतोड उत्तर देत भारतीय सशस्त्र दलांच्या पराक्रमाचे कौतुक केले आणि पाकिस्तानलाही खडे बोल सुनावले. पहलगाम हल्ल्यानंतर लगेचच आपल्या सशस्त्र दलांनी कारवाई केली. दहशतवाद्यांच्या पान २ वर

### हार मानून पकिस्तान गुडघ्यावर आला

- १० मे रोजी सकाळी भारतीय वायुसेने पाकिस्तानवर हल्ला केला तेव्हा पाकिस्तानने हार मानली आणि ते गुडघ्यावर आले. त्यांनी आपल्या डीजीएमओंशी संपर्क केला आणि हे सगळे हल्ले थांबवा अशी विनंती केली. त्यावेळी आम्ही पाकिस्तानला बजावले की आम्ही ऑपरेशन सिंदूर स्थगित केले आहे.
- पाकिस्तानने यापुढे चुकूनही कुठलीही आगळीक केली तर त्यांना ऑपरेशन सिंदूर अंतर्गतच उत्तर दिले जाईल असे आपण त्यांना ठणकावून सांगितले. भारतीय वायुसेनेचे हल्ले, नियंत्रण रेषेवरची लष्कराची कारवाई आणि नौदलाची अचूक कारवाई यामुळे पाकिस्तानला पराभव मान्य करावा लागला. पाकिस्तानचा पराभव साधासुधा नव्हता.
- पाकिस्तानचे सैन्यबलही हरले आणि त्यांचे मनोबलही ते हरवून बसले. पाकिस्तानच्या डीजीएमओंनी कारवाई थांबवा, हल्ले थांबवा अशी याचना केली. त्यानंतर शस्त्रविराम करण्यात आला, असे सांगत युद्धविरामात अमेरिकेच्या हस्तक्षेपाचा मुद्दा राजनाथ सिंह यांनी साफ फेटाळून लावला.

## बुद्धिबळ

### दिव्या देशमुख ठरली चौथी वुमन ग्रँडमास्टर



**बटुमी :** ६४ चौरसावर गेल्या १४ वर्षांत खेळत दिव्या देशमुखने आपले नाव इतिहासात कोरले आहे. २०१३ मध्ये सर्वात कमी वयाची वुमन फिडे मास्टर बनून सुरुवात केलेल्या दिव्याने आता बाटुमी येथे झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेत अंतिम फेरीत विजय प्राप्त करत भारतासाठी नवा मैलाचा दगड ठरवला आहे. १९ वर्षांची ही विश्व कनिष्ठ विजेती खेळाडू गेल्या ३४ वर्षांत महिला कॅन्डिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरणारी पहिली किशोरवयीन ठरली आहे.

(सविस्तर वृत्त पान दोनवर)

## संक्षिप्त

### रवींद्र चव्हाणांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**नवी दिल्ली :** भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीत भेट घेतली. प्रदेशाध्यक्षपदी निवडीनंतर त्यांची पंतप्रधानांशी ही पहिलीच भेट होती. महाराष्ट्रातील संघटनात्मक कामाचा आढावा त्यांनी पंतप्रधानांना सादर केला. यावेळी मोदींकडून पुढील कार्यासाठी रवींद्र चव्हाण यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांनी यावेळी 'कार्यविस्तार अभियान' संदर्भातील पुस्तिका पंतप्रधानांना सादर केली.

### भंडारा जिल्हा बँकेत पटोले पॅनेलचा पराभव

**भंडारा :** भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या निकाल आज जाहीर झाला असून यामध्ये काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या पॅनेलचा दारुण पराभव झाला. महायुतीच्या पॅनेलचा विजय झाला असून ११ उमेदवार निवडून आले आहेत. तर नाना पटोले यांच्या परिवर्तन शेतकरी पॅनेलमधून फक्त चार उमेदवार निवडून आले. त्यामुळे नाना पटोले यांना स्वतःच्या जिल्ह्यातच पराभवाच्या सामना करावा लागला.

### रेव्ह पार्टीतील दोघांनी घेतले होते अल्कोहोल

**पुणे :** खराडी रेव्ह पार्टी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सातपैकी प्रांजल खेवलकर आणि श्रीपाद यादव यांनी अल्कोहोल घेतल्याचे अहवालात म्हटले आहे. झी २४ तासने हे वृत्त दिले आहे. ससून रुग्णालयाचा अहवाल पुणे पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आला असून ससून रुग्णालयात आरोपींची वैद्यकीय तपासणी करुन सर्व आरोपींचे रक्ताचे व लघवीचे नमुने फॉरेन्सिक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

### शिवसेना चिन्ह-पक्ष २० ऑगस्टला सुनावणी

**नवी दिल्ली :** शिवसेना चिन्ह आणि पक्ष या विषयावरील सर्वोच्च न्यायालयात २० ऑगस्टला सुनावणी होणार आहे. यासंदर्भात शिवसेनेचे नेते दिल्लीत असून सुनावणीच्या पार्श्वभूमी वरिष्ठ वकिलांच्या भेटीगाठी ते डेत आहेत. मंत्री शंभूराज देसाई व मंत्री उदय सामंत दिल्लीत वरिष्ठ वकिलांना भेटले. यादरम्यान या नेत्यांची दिल्लीत भाजपाच्या काही नेत्यांच्या भेटी होण्याची शक्यता आहे. महायुतीमधील घडामोडींवर देखील नेत्यांशी चर्चा होण्याची शक्यता आहे.

# १२ हजारांची लाच मागणाऱ्या हेडकॉन्स्टेबलवर गुन्हा

प्रतिनिधी। नांदेड

ट्रॅक्टर परत घेणाऱ्या एजन्सीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यासाठी १२ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या हेडकॉन्स्टेबल ज्ञानेश्वर भीमराव तिडके यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदाराने फायनान्स कंपनीमार्फत घेतलेले ट्रॅक्टर संबंधित एजन्सीने त्यांच्या परवानगीशिवाय परत नेले होते. या प्रकरणी एजन्सीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल व्हावा यासाठी तक्रारदाराने पोलीस अधीक्षक कार्यालयात अर्ज सादर केला. ही चौकशी हेडकॉन्स्टेबल तिडके यांच्याकडे सोपविण्यात आली. तक्रारदाराने त्यांची भेट घेतली असता तिडके यांनी, "साहेबांना भेटण्यासाठी पैसे द्यावे लागतात, नाहीतर असेच अर्ज पडून राहतात," असे सांगत, ठाणेदारांना सांगून गुन्हा दाखल करण्यासाठी १२ हजरा रुपयांची लाची मागणी केली. या तक्रारीची पडताळणी सात मे २०२५ रोजी करण्यात आली. त्यावेळी तिडके यांनी लाच रक्कम एक लाख रुपये मागितल्याचे समोर आले. यानंतर तीन वेळा सापळा कारवाई करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, तिडके प्रत्येक वेळी अनुपस्थित राहिले आणि त्यांचा मोबाईलही बंद असल्याने प्रत्यक्ष कारवाई करता आली नाही. यानंतर तक्रारदाराचा देखील काही काळ संपर्क मिळाला नाही. अखेर पोलीस निरीक्षक माधुरी यावलीकर यांच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ व ७ ए अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक प्रीती जाधव करत असून, कार्यवाहीचे पर्यवेक्षण पोलीस उपाधीक्षक पान २ वर

## नरेंद्र मोदी-ट्रम्प यांच्यात १७ जूनपर्यंत संवादच नाही



ऑपरेशन सिंदूर सुरु असताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कोणतीही मध्यस्थी केली नाही. २२ एप्रिल ते १७ जूनपर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात संवादच झालेला नाही. मग मध्यस्थीचा प्रश्न येतो कुठून?, असा प्रतिसवाल करुन परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आज विरोधकांच्या आरोपातील हवा काढून घेतली. ट्रम्प यांच्याकडून सातत्याने केला जाणारा मध्यस्थीचा दावा जयशंकर यांनी पान २ वर

## अमित शहांनी काँग्रेसला विदेशी मुद्द्यावर डिवचले



लोकसभेत बोलताना परराष्ट्र मंत्री जयशंकर यांना विरोधकांनी रोखण्याचा प्रयत्न केला. त्यावर गृहमंत्री अमित शहा चांगलेच संतापले. संतापालेल्या गृहमंत्री अमित शहांनी थेट उभे राहून काँग्रेसवर हल्ला चढवला. देशाची शपथ घेतलेले परराष्ट्र मंत्री येथे बोलत आहेत. त्यावर तुम्हाला (विरोधकांना) विश्वास नाही. त्यांना कुठल्यातरी इतर देशावर विश्वास आहे. मी समजू शकतो की त्यांच्या पक्षात विदेशाचे महत्व किती आहे. पान २ वर

### भाजपाचे निर्विवाद वर्चस्व दाखवून द्या
# महायुती म्हणूनच लढणार : मुख्यमंत्री

वृत्तसंस्था। वर्धा

विधानसभा निवडणुकीत आपण सर्व रेकॉर्ड मोडले. १३७ जागा भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली आपण जिंकलो. ३५ वर्षाच्या रेकॉर्डमध्ये इतक्या जागा कोणालाही जिंकता आल्या नाही, हा रेकॉर्ड आपण केला. यापूर्वी महाराष्ट्राचा रेकॉर्ड १२२ जागेचा होता तोही आपण तोडला. या पाच वर्षात महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा आपण पूर्ण करणार आहोत. हे सरकार जेव्हा पाच वर्षे पूर्ण करेल तेव्हा महाराष्ट्राचे पूर्ण कायापालट झालेले असेल, असा विश्वास व्यक्त करुन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केले. वर्ध्याच्या सेवाग्राम येथील चरखागृहात आज पान २ वर

## सुरेश वरपूडकरांचा आज भाजपा प्रवेश

वृत्तसंस्था। परभणी

सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेल्या भावनेतूनच आपण भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते सुरेश वरपुडकर यांनी दिली. आज माध्यमांशी बोलताना त्यांनी मंगळवारी दुपारी तीन वाजता मुंबईत भाजपा पक्ष कार्यालयात प्रवेश सोहळा होणार असल्याची माहिती दिली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याबरोबर आपण चर्चा केली. त्यानंतरच भाजपात प्रवेशाचा निर्णय झाला, असे वरपुडकर यांनी स्पष्ट केले.

# मुखेडमध्ये युवकाचा आत्मदहनाचा प्रयत्न

*पीएम आवास योजनेच्या थकबाकीचा प्रश्न गंभीर*

प्रतिनिधी। मुखेड

प्रधानमंत्री आवास योजनेसारख्या गरिबांसाठी राबविण्यात येणाऱ्या महत्वाकांक्षी योजनेतील अडथळ्यांनी अखेर एका युवकाला थेट आत्मदहनाच्या टोकाच्या पावलाकडे नेले. सोमवारी सकाळी ११.३० वाजता मुखेड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात घडलेल्या या घटनेमुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. बेरळी (बु.) येथील मारोती आनंदराव जुन्ने (वय २५) या युवकाने आपल्या वडिलांच्या नावाने पान २ वर



### टोकाचे पाऊल टाळावे : रामोड

घटनेनंतर गटविकास अधिकारी चंद्रशेखर रामोड यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. संबंधित निधी रखडण्यामागचे पान २ वर

# राज्यात पावसाचा जोर ओसरणार

वृत्तसंस्था। मुंबई

राज्यात गेल्या आठवड्यात सक्रीय झालेल्या पावसाने रविवारपर्यंत जोरदार हजेरी लावली. त्यानंतर सोमवारी सकाळपासून सर्वत्र पावसाचा जोर ओसरला. दरम्यान, राज्यात पुढील तीन ते चार दिवस पावसचा जोर कमी राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या कालावधीत कोकण, विदर्भात पावसाची अधूनमधून शक्यता आहे. मात्र, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचे प्रमाण कमी राहील. राज्यातील सर्व भागात मागील संपूर्ण आठवडा मुसळधार पाऊस पान २ वर

### मराठवाड्यात सामान्य पाऊस

मराठवाड्यात हंगामात पहिल्यांदाच सामान्य पावसाची स्थिती नोंदली गेली आहे. गेल्या आठवड्यात या भागात चांगला पाऊस पडला आहे. मराठवाड्यात २८ जुलैपर्यंत २४२.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. साधारण एक जून ते २८ जुलै या कालावधीत येथे २८६.५ मिमी पाऊस पडणे अपेक्षित असते. याचबरोबर राज्यातील सर्व चारही उपविभागांमध्ये पावसाची सामान्य स्थिती आहे, असे आजवरच्या आकड्यांतून दिसते.

**पर्जन्यमान** | **नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**

# विष्णुपुरीनंतर इसापूर धरण ७५ टक्के भरले!

प्रतिनिधी। नांदेड

नांदेड, हिंगोली आणि यवतमाळ जिल्ह्यांना जीवनदायी ठरणाऱ्या इसापूर धरणात यंदा समाधानकारक पाणीसाठा झाला आहे. २८ जुलै रोजी सकाळी आठपर्यंत या धरणात तब्बल ७२५.६८८ दशलक्ष घनमीटर, म्हणजेच ७५.२७ टक्के पाणीसाठा नोंदवला गेला आहे. मुसळधार पावसामुळे जलसाठा झपाट्याने वाढत असून, पैनगंगा नदीकाठी वसलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

इसापूर धरण पैनगंगा नदीवर असून, हिंगोली व यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमेवर आहे. हे धरण मातीचे असून, पैनगंगा प्रकल्पातील महत्त्वाचा भाग मानले जाते. परिसरातील शेतीसाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी या धरणाचे मोठे महत्त्व आहे. धरण सध्या ७५ टक्क्यांहून अधिक भरल्याने, प्रशासनाने खबरदारीचा उपाय सुरू केला आहे. सध्या सुरू असलेला जोरदार पावसामुळे जलसाठा लवकरच पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. अधीक्षक अभियंता एस. डी. खडके यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३१ जुलैपर्यंत धरण पान २ वर



### शेतकऱ्यांसाठी दिलासादायक

यावर्षीचा पावसाळा हिंगोली, यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे. इसापूर धरणातील पाणीसाठा भरपूर झाल्याने खरीप हंगामाला चांगली चालना मिळण्याची शक्यता आहे. सिंचनाची गरज भागवण्यास हे पाणी उपयोगी पडणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

### नदीकाठी गर्दी करू नये

सध्या दिलेला सतर्कतेचा इशारा प्राथमिक स्वरूपाचा असून, पुढील निर्णय पावसाच्या तीव्रतेनुसार आणि धरणातील पाण्याच्या पातळीवर आधारित घेतले जातील. नागरिकांनी नदीकाठी अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

## दहावी, बारावी पुरवणी परीक्षेचा निकाल आज

वृत्तसंस्था। पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल मंगळवारी (२९ जुलै) जाहीर करण्यात येणार आहे. मंडळाचे सचिव देवीदास कुलाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे आज ही माहिती दिली. दहावीची पुरवणी परीक्षा २४ जून ते ८ जुलै, तर बारावीची पुरवणी परीक्षा २४ जून ते २६ जुलै या कालावधीत घेण्यात आली. दहावीच्या परीक्षेसाठी ३४ हजार ५६२, तर बारावीच्या परीक्षेसाठी ६८ हजार ९८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. मंगळवारी पान २ वर

# ३६ हजारांचा गुटखा जप्त; दोन आरोपींना अटक



प्रतिनिधी। नांदेड

देगलूर तालुक्यातील मरखेल पोलिसांनी कारवाई करत २७ जुलै रोजी एका कारमधून ३६,४०० रुपयांचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले. संबंधित वाहनाची किंमत सात लाख रुपये असून, एकूण जप्त मुद्देमालाची रक्कम ७,३६,४०० रुपये इतकी आहे. याप्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजता मरखेल ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी गस्त घालत असताना त्यांनी टोयोटा कार (केए ३८ एन ३१६९) थांबवून पान २ वर

# बुद्धिबळाच्या पटावर नव्या 'राणी'चे राज्य! महाराष्ट्राची लेक दिव्या देशमुख वर्ल्ड चॅम्पियन

वृत्तसंस्था | बटुमी (जॉर्जिया)

जॉर्जियातील बटुमी येथे खेळल्या गेलेल्या २०२५ च्या फिडे विश्वचषक स्पर्धेत महाराष्ट्रातील दिव्या देशमुखने धमाकेदार विजय मिळवून विश्वचषक विजेतेपद पटकावले. विशेष म्हणजे तिची अंतिम लढत भारताच्याच कोनेरु हम्पीबरोबर झाली.

दिव्या देशमुख आणि कोनेरु हम्पी यांच्यातील सुरुवातीचे सामने अनिर्णित राहिले. शनिवार आणि रविवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीने नवीन बुद्धिबळ स्टार दिव्या देशमुखला आघाडी मिळवू दिली नाही. त्यामुळे मूळ सामना १-१ गुणांनी बरोबरीत राहिला. सोमवारी खेळल्या गेलेल्या रॅपिड राउंडमध्ये जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानी असलेल्या नागपूरच्या दिव्या देशमुखने पहिल्या गेममध्ये पांढऱ्या सोंगट्यांसह सुरुवात केली. आक्रमक खेळ करत तिने जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या कोनेरू हम्पीशी आधी बरोबरी साधली. मग रॅपिड राउंडच्या दुसऱ्या गेममध्ये काळ्या सोंगट्यांसह खेळताना दिव्याने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले आणि कोनेरूला पराभवाची धूळ चारली. बुद्धिबळ तज्ज्ञांच्या मते, दिव्याची तयारी उत्कृष्ट होती. स्टार बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद याने सामन्यापूर्वी सांगितले होते, की कोनेरू हम्पी खूप मजबूत आहे. परंतु, सध्या मानसिकदृष्ट्या कणखर असलेल्या दिव्याच्या बाजूने माप झुकण्याची शक्यता अधिक आहे. त्यांचे म्हणणे खरे ठरले. मोठी गोष्ट म्हणजे दिव्या आणि हम्पी दोघींनीही चीनच्या खेळाडूंना हरवून अंतिम फेरी गाठली होती. भारतामध्ये बुद्धिबळाची क्रेझ वेगाने वाढत आहे आणि त्यामुळे या दोघींनाही नवीन स्पॉन्सर्स, ब्रँड डील्स आणि व्यावसायिक संधी मिळण्याची शक्यता प्रचंड आहे. भारताची बुद्धिबळाची दुनिया आता नवी दिशा घेत आहे आणि दिव्या देशमुख या प्रवासाची आघाडीची खेळाडू ठरली आहे. महत्वाचे म्हणजे कोनेरु हम्पी प्रथम ग्रँडमास्टर बनली तेव्हा दिव्याचा जन्मही झाला नव्हता. याचा अर्थ दिव्याच्या वयाइतका कोनेरु हम्पीचा अनुभव आहे. त्यामुळे दिव्याचे हे यश अधिक ठसठसीत मानले जाते.

### आक्रमक शैलीच्या दिव्या देशमुखची देदिप्यमान कारकीर्द

मुळची नागपूरची असलेली दिव्या देशमुख रॅपिड फॉरमॅटमध्ये तिच्या आक्रमक आणि निडर शैलीसाठी विशेष ओळखली जाते. दिव्याचे वडील डॉ. जितेंद्र देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयत डॉक्टर आहे, तर आई डॉ. नम्रता यादेखील खासगी क्लिनिक चालवायच्या.

दिव्याला खऱ्या अर्थाने ओळख मिळाली ती इराणमधील आशियाई युवा चॅम्पियनशिप स्पर्धेत तिने पटकावलेल्या दोन सुवर्णपदकांमुळे. शिवाय दिव्याने बुद्धिबळातील प्रतिष्ठेच महिला फिडेमास्टर हा किताबही आपल्या नावे केला. कमी वयात हा बहूमान मिळविणारी दिव्या भारतातील पहिली महिला बुद्धिबळपटू असून विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये २५ सुवर्ण, ६ रौप्य आणि ४ ब्रँझपदकांची कमाई तिने केली आहे. बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये तिच्या नावावर सुवर्णपदक आणि ब्राँझपदकाची कमाई आहे.

### विजेत्यासाठी मोठी बक्षिसे

फिडे महिला विश्वचषक २०२५च्या अंतिम सामन्यातील विजेत्या दिव्या देशमुखला सुमारे ४२ लाख रुपये आणि उपविजेत्या कोनेरू हम्पीला सुमारे ३५,००० अमेरिकन डॉलर्स म्हणजेच सुमारे ३० लाख रुपये बक्षीस म्हणून मिळणार आहेत. याशिवाय, या खेळाडूंनी अत्यंत प्रतिष्ठित कॅन्डिडेट्स स्पर्धेसाठीही पात्रता मिळवली आहे. अशा परिस्थितीत, त्यांना आता पूर्वीपेक्षा जास्त प्रायोजक मिळण्याची अपेक्षा आहे.




### दिव्याचे ऐतिहासिक यश

नागपूरची १९ वर्षांची दिव्या देशमुख आता केवळ वर्ल्डकप विजेतीच नाही, तर तिने या ऐतिहासिक विजयासोबत ग्रँडमास्टरचा मानही मिळवला आहे. या क्षणी दिव्या खूपच भावूक झाली होती. तिच्यासाठी हे आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरले. विशेष म्हणजे, दिव्या आधीच 'कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरली आहे, जे बुद्धिबळ विश्वविजेतेपदाच्या वाटचालीतील एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## संक्षिप्त

### मंदिरात चेंगराचेंगरी, दोन भाविकांचा मृत्यू

**लखनऊ :** उत्तराखंडमधील हरिद्वार येथील मानसा देवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीनंतर आज श्रावणातील पहिल्याच सोमवारी उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील पौराणिक औसनेश्वर महादेव मंदिरात विद्युत प्रवाह उतरल्याच्या बातमीमुळे चेंगराचेंगरी झाली ज्यामध्ये दोन भाविकांचा मृत्यू झाला असून २९ जण जखमी आहेत. श्रावणी सोमवारी रात्री १२ नंतर जलाभिषेकासाठी जमलेल्या भाविकांच्या प्रचंड गर्दीत जलाभिषेक सुरू झाला. दरम्यान दुपारी दोनच्या सुमारास मंदिर परिसरात विद्युत प्रवाह पसरल्यामुळे ही चेंगराचेंगरी झाल्याचे समजते.

### बाजारात गोळीबार, सहा जणांचा मृत्यू

**बँकाक :** थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये सोमवारी एकाने केलेल्या बेछूट गोळीबारात सहा जणांचा मृत्यू झाला. तर एक जण जखमी झाला. हा गोळीबार एका लोकप्रिय फ्रेश फूड मार्केटमध्ये झाला. पोलीस या घटनेमागच्या कारणांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी सांगितले, की हल्लेखोराने गोळीबार केल्यानंतर स्वत:वर गोळ्या झाडल्या. त्यामुळे त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हा हल्लेखोर कोण होता याची माहिती घेतली जात आहे. तसेच या गोळीबाराचा सध्या थायलंड आणि कंबोडिया यांच्यात सुरू असलेल्या वादाशी काही संबंध नाही ना याचाही तपास केला जात आहे.

### तीन मच्छीमारांचे मृतदेह सापडले

**रायगड :** खांदेरी किल्ल्याजवळ बोट बुडून बेपत्ता झालेल्या तीन मच्छीमारांचे मृतदेह सोमवारी सापडले. अलिबाग तालुक्यातील दिघोडे, सासवणे आणि किहीम येथे हे मृतदेह आढळून आले आहेत. मासेमारी बंदी लागू असताना उरण तालुक्यातील करंजा येथील मनोहर गणपत कोळी यांची तुळजाई नावाची बोट शनिवारी खोल समुद्रात मासेमारीसाठी गेली होती. समुद्र खवळलेला असल्याने, लाटांच्या तडाख्यात सापडून ही बोट बुडाली. त्यावेळी बोटीत एकून ८ मच्छीमार होते. बोटीतील पाच मच्छीमार पोहून किनाऱ्यावर आले होते. तीन मच्छीमार बेपत्ता होते.

### बॅडमिंटन खेळताना तरुणाचा मृत्यू

**हैदराबाद :** हैदराबादच्या नागोले स्टेडियममध्ये बॅडमिंटन खेळताना एका २५ वर्षीय तरुणाचा अचानक मृत्यू झाल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार या तरुणाचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला आहे. रविवारी रात्री ही घटना घडली. गुंडला राकेश हा मित्रांसोबत बॅडमिंटन खेळत होता. खेळता खेळता तो अचानक बेशुद्ध होऊन कोसळला. मित्रांनी त्याला ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेले, परंतु तिथे डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

## मास्टरमाईंड हाशिम मुसा होता पाकिस्तानी लष्करात कार्यरत

# श्रावणी सोमवारीच मिळाले 'ऑपरेशन महादेव'ला यश!

वृत्तसंस्था | श्रीनगर

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये हल्ल्याचा मास्टरमाईंड आणि लष्कर-ए-तैयबाचा टॉप कमांडर हाशिम मुसाला आज भारतीय सुरक्षा दलाने कंठस्नान घातले. मुसा आधी पाकिस्तानी लष्करात सैनिक होता. पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला. त्या हल्ल्याचे नियोजन मुसाने केले होते. त्याच्यावर २० लाखांचे बक्षीस भारतीय सैन्यदलाने जाहीर केले होते. अखेर ९६ दिवसांनी मुसाचा खात्मा करण्यात भारतीय सैन्याला यश आले आहे. २८ जुलैला श्रीनगरच्या लिडवास परिसरात झालेल्या चकमकीत मुसा मारला गेला.

हाशिम मुसाने पहलगाम हल्ल्याचा कट रचला होता. त्यासोबतच तो सोनमर्गमधील बोगद्यात झालेल्या हल्ल्यासाठीही जबाबदार होता. पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय लष्कराने ऑपरेशन महादेव हाती घेतले होते. गेल्या तीन महिन्यांपासून ऑपरेशन सुरु होते. अखेर श्रावणी सोमवारीच भारतीय सैन्याने तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला. यातील दोघांचा सहभाग पहलगाम दहशतवादी हल्ल्यात होता. हाशिम मुसा हा सुलेमान शाह मुसा फौजी नावानेदेखील ओळखला जातो. तो लष्कर-ए-तैयबाचा एक धोकादायक कमांडर होता. हाशिम मुसा सुरुवातीला पाकिस्तानच्या स्पेशल सर्व्हिस ग्रुपमध्ये पॅरा कमांडो होता. या ग्रुपमधील कमांडोंना विशेष प्रशिक्षण दिले जाते. २०२२ मध्ये त्याने भारतात घुसखोरी केली. त्याने अनेक हल्ल्यांचे कट रचले. पहलगाम हल्ल्याची योजना आणि त्या योजनेची अंमलबजावणी करण्यात मुसाचा मोठा वाटा होता. तो १५ एप्रिलपासूनच बैसरण खोऱ्यात तळ ठोकून होता. त्याने सात दिवस रेकी केली होती. सोनमर्ग बोगद्यातील हल्ल्याचे नेतृत्व मुसानेच केले होते. त्यात सात जण मारले गेले होते. दाचीगाम आणि लिडवासच्या जंगलांत तो लपला होता. पाकिस्तानला पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना भारतीय सैन्याने त्याचा खात्मा केला. मुसाला पकडण्यासाठी किंवा मारण्यासाठी सैन्याने २० लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. कारण अनेक हल्ल्यांमध्ये त्याचा सहभाग होता, असे स्पष्ट झाले आहे.



### ऑपरेशन महादेव नावाचे महत्व

या मोहिमेला लष्कराने ऑपरेशन महादेव असे नाव का दिले होते, याबाबत लेफ्टनंट कर्नल सतीश ढगे यांनी माहिती दिली आहे. एबीपी माझाशी बोलताना कर्नल ढगे म्हणाले, की श्रीनगरच्या ज्या भागात ही कारवाई करण्यात आली त्या भागात 'महादेव' नावाचे शिखर (डोंगराचे नाव) आहे. त्या भागात ही कारवाई झाल्यामुळे या कारवाईला 'ऑपरेशन महादेव' असे नाव देण्यात आले.

## दोन दहशतवादी पाकिस्तानी, एकजण अनंतनागचा रहिवासी

वृत्तसंस्था | श्रीनगर

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या ९७ दिवसांनंतर अखेर भारतीय सैन्याला मोठे यश मिळाले आहे. 'ऑपरेशन महादेव' अंतर्गत भारतीय सैन्याने प्रत्युत्तरात्मक कारवाई करत तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. ही चकमक सोमवारी श्रीनगरमधील लिडवास परिसरात झाली. याबाबत चिनार कॉर्प्सने माहिती दिली असून, ही कारवाई पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी नेटवर्कविरोधात करण्यात आल्याचे सांगितले आहे. महत्वाचे म्हणजे श्रावणातील पहिल्याच सोमवारी सैन्यदलाच्या या ऑपरेशन महादेवला यश आले आहे. या तिघांपैकी आदिल हुसैन ठोकर हा अनंतनागचा तर हाशिम मूसा ऊर्फ सुलेमान आणि अली ऊर्फ तल्हा भाई हे दोघे पाकिस्तानी आहेत. अलीकडेच एनआयएने दोन संशयितांना अटक केली होती. मात्र, अटक केलेल्या आरोपींनी ज्या दहशतवाद्यांची नावे उघड केली, ते हेच तिघे होते की अन्य कोणी, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. तरीही आतापर्यंतच्या तपासातून असे संकेत मिळत आहेत की, ऑपरेशन महादेव हे पहलगाम हल्ल्यास जबाबदार असलेल्या याच दहशतवादी मॉड्यूलविरुद्ध राबवण्यात आले आहे.

### चिनी मालाने दिला आणखी एक दगा

काश्मीर खोऱ्यातील घनदाट जंगलात लपून बसलेल्या दहशतवाद्यांचा ठावठिकाणा कळण्यामागे चायनिज अल्ट्रा रेडियो सिस्टिम आहे, असे सांगण्यात येत आहे. सुरक्षा यंत्रणांकडून मानवी गस्त आणि इलेक्ट्रॉनिक सर्व्हिलान्सच्या माध्यमातून शोध घेतला जात होता. ड्रोन, थर्मल इमेजिंग आणि गुप्तचर नेटवर्कच्या माध्यमातून दहशतवाद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात होते. जंगलामध्ये एका चायनिज अल्ट्रा रेडियो कम्युनिकेशन सिस्टिम सक्रिय झाल्याची माहिती मिळाली आणि सुरक्षा दलांना या दहशतवाद्यांचा ठावठिकाणा समजला.

## विरोधकांकडून सरकारवर प्रश्नांची सरबत्ती

# पाकव्याप्त काश्मीर घेण्याची संधी सरकारने का सोडली?

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवर सुरू असलेल्या चर्चेत सुरवातीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी निवेदन केल्यानंतर काँग्रेसचे खा. गौरव गोगोई यांनी ऑपरेशन सिंदूरमधून पाकिस्तानी हल्ल्यांना नामोहरम करत नियंत्रण राखले असताना अचानक सीझफायर का केले?, विरोधी पक्षांचा, जनतेचा सरकारला पाठिंबा असतानाही पाकव्याप्त काश्मीर घेण्याची संधी सरकारने का सोडली? असे सवाल आज चर्चेत केले.

तृणमूल काँग्रेसचे खा. कल्याण बॅनर्जी यांनी पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला तरी कसा? हा हल्ला झाला तेव्हा गृह मंत्रालय काय करत होते?, सीआयएसएफ काय करत होते? असे सवाल उपस्थित केले. खा. गोगई म्हणाले, की सरकारने सत्य सांगण्यास घाबरू नये. आम्ही सरकारसोबत आहोत. पहलगाममध्ये दहशतवादी कसे, कुठून आले?, बैसरणमध्ये पाच दहशतवादी कसे घुसले, त्यांचा हेतू काय होता? त्या दहशतवाद्यांनी जम्मू-काश्मीरच्या पर्यटन उद्योगाला धक्का दिला. नंतर त्यांना फरार होण्यास कोणी मदत केली?, सॅटेलाईट आहे, पेगॅसस आहे, ड्रोन आहे. तरीही पकडू का शकले नाही, असे सवाल त्यांनी केले. दहशतवाद्यांचा कणा मोडून काढला आहे. तरीही उरी, पुलवामा हल्ले झाले. या हल्ल्यांची जबाबदारी गृहमंत्र्यांनी घेतली पाहिजे. काश्मीरच्या उपराज्यपालांच्या मागे सरकारने लपू नये. प्रसार माध्यमांतून सरकार सांगत होते, की आता आपण मागे हटणार नाही. आता पाकिस्तानचे काही खरे नाही, असेच आम्हाला वाटत होते. आणि आम्ही सर्वजण सरकारसोबत होतो. सरकारच्या कारवाईला आमचे समर्थन होते. पाठिंबा होता. तरीही ऑपरेशन सिंदूर कारवाई सुरू असताना आपण मागे का हटलो? पाकिस्तान व्याप्त काश्मीर घेण्याची ही संधी होती. आज नाही घेणार नाही तर कधी घेणार पाकव्याप्त काश्मीर? ऑपरेशन सिंदूर हीच चांगली संधी होती पाकव्याप्त काश्मीर परत घेण्याची. उरी, पुलवामा वेळी सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक आपण केला. तेव्हाही दहशतवाद्यांच्या इन्फ्रास्ट्रक्चवर हल्ला केलाच होता की, पण तिकडून पुन्हा हल्ला झालाच, याकडे त्यांनी लक्ष वेधले.



### क्रिकेट कशासाठी?

एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही म्हणत सिंधू करार रद्द केला, तर मग पाकिस्तानसोबत क्रिकेट का खेळता असा प्रश्न चर्चेत उपस्थित केला. पाकिस्तानातून दहशतवादी येऊन आमच्या लोकांना मारतात आणि आपण त्याच देशाशी क्रिकेट खेळतो? असा सवाल त्यांनी केला.

## पान एकवरून

**पहलगाम हल्ल्याचा बदला...**

करण्यात आल्याचे सांगितले आहे. लष्करातील सूत्रांच्या माहितीनुसार, आदिल हुसैन ठोकर (अनंतनागचा रहिवासी), हाशिम मुसा ऊर्फ सुलेमान (पाकिस्तानी) आणि अली ऊर्फ तल्हा भाई (पाकिस्तानी) या तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांचे मृतदेह मिळाले आहेत. त्यापैकी सुलेमान आणि यासिर हे पहलगाम हल्ल्यात सामील होते, अशी माहिती समोर आली आहे. तर हाशिम मुसा हा पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाईंड आहे. लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, श्रीनगरमधील दाचिगाम राष्ट्रीय उद्यानाजवळ हरवन परिसरात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक सुरू झाल्याची माहिती लष्कराने दुपारी १२:३० वाजता दिली होती. लष्कराच्या चिनार कॉर्प्सने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर दिलेल्या माहितीनुसार, ऑपरेशन महादेवमध्ये दुपारी १:३० वाजता तीन दहशतवादी मारले गेले आहेत. दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी हरवनच्या मुलनार भागात कारवाई सुरू केली होती. चकमकीनंतर दहशतवाद्यांकडून अमेरिकन एम ४ कार्बाइन, एके-४७ रायफल, १७ रायफल ग्रेनेड आणि इतर संशयास्पद सामग्री जप्त केली आहे. गुप्त माहितीच्या आधारे आज सकाळी शोधमोहीम सुरू करण्यात आली होती. यादरम्यान दोन वेळा गोळीबाराचा आवाज आला, त्यानंतर सुरक्षा दलांनी परिसराला पूर्ण वेढा घालून दहशतवाद्यांचा खात्मा केला.

**ऑपरेशन सिंदूर राबवून...**

नऊ ठिकाणांवर (इन्फ्रास्ट्रक्चर साईट्स) अचूक हल्ले चढवण्यात आले, ज्यात १०० हून अधिक दहशतवादी, त्यांचे प्रशिक्षक आणि सूत्रधार (हँडलर्स) लक्ष्य ठरले, असे राजनाथ सिंह यांनी सांगितले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीच्या दाव्यालाही राजनाथ सिंह यांनी फेटाळून लावले. ऑपरेशन सिंदूर थांबवण्यासाठी भारतावर कोणताही आंतरराष्ट्रीय दबाव नव्हता, असे त्यांनी स्पष्ट केले. पाकिस्तानने भारतीय लक्ष्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, पण, एस-४०० आणि इतर हवाई संरक्षण प्रणालींनी तो पूर्णपणे अयशस्वी ठरवला. आपले कोणतेही महत्त्वाचे नुकसान झाले नाही, असे त्यांनी सांगितले. ऑपरेशन सिंदूरमध्ये ज्या भगिनींचे कुंकू पुसले गेले त्याचे चोख उत्तर आपण पाकिस्तानला दिले. पाकिस्तानच्या प्रत्येक आगळिकीला आपण करारा जवाब दिला. भारतीय नौसेना, लष्कर आणि वायुदल या तिन्ही दलांनी महत्त्वाची कामगिरी करत पाकिस्तानला उत्तर दिले. भारत दहशतावादाविरोधात गप्प बसणार नाही हे आपण पाकिस्तानला आपल्या या कारवाईतून दाखवून दिले आहे, असेही राजनाथ सिंह म्हणाले.

**नरेंद्र मोदी-ट्रम्प यांच्यात...**

स्पष्ट शब्दांत फेटाळून लावला. पहलगाम हल्ल्यानंतर एक स्पष्ट, मजबूत संदेश देणे गरजेचे होते. पाकिस्तानने सगळ्या मर्यादा सोडल्या होत्या. त्यामुळे याचे परिणाम गंभीर होतील, हे त्यांना दाखवून देणे आवश्यक होते. त्यामुळे २३ एप्रिलला सुरक्षा संबंधित कॅबिनेट समितीची बैठक झाली. त्यात १९६० मधील सिंधू जल करार तत्काळ स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवादाला खतपाणी देणे थांबवत नाही, तोपर्यंत सिंधू जल करार स्थगित असेल, असे जयशंकर यांनी सांगितले.

**अमित शहांनी काँग्रेसला...**

(सोनिया गांधी यांचे विदेशी मूळ हा संदर्भ येथे असल्याचे बोलले जात आहे) पण याचा अर्थ हा नाही की, त्यांनी पक्षाच्या सगळ्या गोष्टी सभागृहात घेऊन यावे. अध्यक्ष महोदय म्हणूनच ते (विरोधी पक्ष) तिकडे बसले आहेत आणि आणखी २० वर्षे तिकडेच बसतील, असे म्हणत अमित शहा यांनी काँग्रेस खासदारांना टोला लगावला.

**१२ हजारांची लाच मागणाऱ्या...**

प्रशांत पवार करत आहेत. सापळा कारवाईसाठी नियुक्त पथकात पोहे किरण कणसे, पोलीस शिपाई ईश्वर जाधव, शाम गोरपल्ले आणि चापोहेकॉ प्रकाश मामुलवार यांचा समावेश होता.

**महायुती म्हणूनच लढणार...**

भाजपाची विदर्भस्तरीय आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. आपण ही निवडणूक महायुती म्हणूनच लढत आहोत. अर्थातच ज्याठिकाणी काही अडचणी आहेत तिथे आमच्याशी चर्चा करुन निर्णय घ्यायचे आहेत. ज्याठिकाणी महायुतीमध्ये निवडणूक होणार नाहीत त्याठिकाणी आपल्या मित्रपक्षावर टीका करायची नाही. कारण आपण सत्तेत एकत्र आहोत त्यामुळे आपल्याला मैत्रीपूर्ण लढती करायच्या आहेत. आपल्याला या निवडणुकीत भाजपाचे निर्विवाद वर्चस्व दाखवायचे आहे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला.आपले विरोधक आपल्याशी विकासाची स्पर्धाच करू शकत नाही. ते रोज नवनवीन एकप्रकारे नॅरेटिव्ह पसरवत असतात. ते विकासाची चर्चाच होऊ देत नाही. वरून इंजेक्शन मिळाल्याबरोबर काही पोपट जनसुरक्षा कायद्याबाबत बोलू लागले आहेत. ज्यांना भारताचे संविधान मान्य नाही, अराजकता वादी विचारसरणी पोहचवायचे आहे. सर्वांना एकमेकांच्या विरोधात लढवायला लावायचे असे अर्बन नक्षल काम करत आहेत, म्हणून यांच्याविरोधात कार्यवाही करणे गरजेचे आहे, असं ते म्हणाले.

**मुखेडमध्ये युवकाचा...**

मंजूर झालेल्या पीएम आवास योजनेतील १८,५०० रुपये मस्टर देयक रखडल्याच्या निषेधार्थ गटविकास अधिकाऱ्यांच्या समोरच अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्याच्या या धक्कादायक कृतीने काही क्षणांमध्ये दालनातील वातावरण तणावपूर्ण झाले. सुदैवाने तिथे उपस्थित असलेले सामाजिक कार्यकर्ते गौस अली सलगरकर यांनी प्रसंगावधान राखत त्याच्या हातातील आगपेटी हिसकावून घेतल्यामुळे मोठा अनर्थ टळला. पीएम आवास योजनेंतर्गत लाभार्थींना घरबांधणीसाठी टप्प्याटप्प्याने निधी दिला जातो. मात्र, या टप्प्यांतील निधी वेळेवर मिळाला नाही, तर घराचे काम अर्धवट राहते. जुन्ने यांचे म्हणणे आहे, की त्याच्या वडिलांच्या नावाने मंजूर झालेल्या घरकुलासाठीचा १८,५०० रुपयांचा निधी महिन्यांपासून रखडला होता. अनेकवेळा कार्यालयाचे उंबरठे झिजवूनही उत्तर मिळाले नाही. यामुळे आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला, असे ते म्हणाले. या घटनेनंतर तालुक्यात घरकुल योजनेतील भ्रष्टाचार आणि एजंट संस्कृतीविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. काही कार्यकर्त्यांनी असा आरोप केला की, योजनेंतर्गत निधी मिळवण्यासाठी एजंटांना पैसे द्यावे लागतात. थेट लाभार्थींना वेळेवर पैसे मिळत नाहीत. यामुळे गरीब कुटुंबांची फसवणूक होत आहे.

**टोकाचे पाऊल टाळावे...**

कारण तपासले जाईल आणि दोषींवर कारवाई केली जाईल. त्यांनी युवकाच्या कृत्याची गंभीर दखल घेत आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल टाळण्याचे आवाहन केले.

**राज्यात पावसाचा जोर...**

कोसळला. मुंबईत पावसाचा जोर वाढला होता. संततधार पावसामुळे मुंबईकरांना काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र, आता मुंबईतही पावसाची फारशी शक्यता नाही. अधूनमधून हलक्या सरी बरसतील असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, सोमवारी सकाळपासून राज्यात पावसाचा जोर ओसरला आहे. त्यामुळे मुसळधार पावसाची शक्यता पुढील काही दिवस तरी नसल्याचा अंदाज आहे. कोकणातील काही भागात मुसळधार पाऊस पडेल अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीसही मुसळधार पावसाची शक्यता कमी असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. साधारण एक ते सात ऑगस्ट या कालावधीत राज्यातील बहुताश ठिकाणी सरासरीपेक्षा कमी पाऊस, पडण्याची शक्यता वर्तवली आहे. पुढील काही दिवस वगळता हवेच्या दाबात सातत्याने होणाऱ्या बदलामुळे राज्यात ऑगस्टमध्ये चांगल्या पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे.

**३६ हजारांचा गुटखा जप्त...**

तपासणी केली. तपासणीदरम्यान गाडीत विविध कंपन्यांचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आला. याप्रकरणी पांडुरंग यांगळे यांच्या तक्रारीवरून मरखेल पोलिसांनी बबन पिराजी फुलेवाड (वय ३२) आणि प्रकाश पांडुरंग कोकणे (वय ३०, दोघेही रा. हंगरगा, जि. बिदर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर व पोलीस अंमलदार विलास पवार यांनी परिश्रम घेतले.

**दहावी, बारावी पुरवणी...**

विद्यार्थ्यांना दुपारी एक वाजता ऑनलाईन निकाल पाहता येईल. विद्यार्थ्यांना गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळामार्फत ३० जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत संकेतस्थळाद्वारे अर्ज आणि शुल्कही ऑनलाईन भरता येणार आहे. जून-जुलै २०२५ च्या दहावी, बारावीची परीक्षा सर्व विषयांसह देऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणीसुधार योजनेअंतर्गत परीक्षा देण्यासाठी फेब्रुवारी-मार्च २०२६, जून-जुलै २०२६ आणि फेब्रुवारी-मार्च २०२७ या तीन संधी उपलब्ध राहतील. फेब्रुवारी-मार्चमध्ये होणारी परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या नियमित, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र मिळालेले खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार अंतर्गत, तसेच आयटीआयद्वारे श्रेयांक हस्तांतरण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन करता येणार आहे.

**इसापूर धरण ७५ टक्के...**

८८४.१२ दशलक्ष घनमीटर म्हणजेच ९१.४३ टक्के भरू शकते, असा अंदाज आहे. यामुळे संभाव्य विसर्गाची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. धरण भरत असल्याने पैनगंगा नदीच्या दोन्ही तीरावरील गावांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पाण्याचा विसर्ग आवश्यक झाल्यास, त्या आधीच संबंधित ग्रामपंचायत, पोलीस, महसूल व अन्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना सूचना दिल्या जातील. त्यादृष्टीने ग्रामस्तरावर स्वयंसेवकांची यादी, अलर्ट सिस्टीम आणि आवश्यक साधनसामग्रीचे नियोजन सुरु आहे.

## गुंतवणूकदारांचे १३ लाख कोटी स्वाहा

वृत्तसंस्था | मुंबई

सोमवारी सकाळी गुंतवणूकदारांच्या नजरा बाजारावर खिळल्या होत्या. गुरुवारपाठोपाठ शुक्रवारी झालेल्या मोठ्या घसरणीनंतर बाजार काहीसा सुधारेल अशी अपेक्षा होती. पण, वास्तवाने त्यांना धक्का दिला. सुरुवातीला घसरणीसह ओपनिंग केल्यानंतर बाजारातील पडझड आणखी खोलवर गेली आणि दुपारी दोन वाजेपर्यंत सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकात आपटीबार फुटला. सेन्सेक्स ५७८.२१ अंकांनी घसरून ८०,८८४.८८ वर पोहोचला, तर निफ्टी २४,७०० महत्त्वपूर्ण पातळीच्या खाली १६८.६५ अंकांनी घसरून २४,६६८.३५ वर पोहोचला. अशा प्रकारे, तीन ट्रेडिंग सत्रांमध्ये गुंतवणूकदारांचे १३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

## थायलंड-कंबोडियात अखेर युद्धविराम!

वृत्तसंस्था | बँकाक

एक प्राचीन मंदिर आणि सीमावादावरून आग्नेय आशियातील थायलंड आणि कंबोडिया या देशांमध्ये गेल्या काही दिवसांपासून भीषण संघर्ष सुरू होता. तसेच दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ले प्रतिहल्ले सुरू होते. अखेरीस थायलंड आणि कंबोडियामध्ये बिनशर्त युद्धविरामावर सहमती झाली असून, दोन्ही देशांमधील संघर्ष थांबला. शेजारील देश असलेल्या मलेशियाने मध्यस्थीचा प्रस्ताव दिल्यानंतर दोन्ही देशांमधील संघर्षाला विराम मिळाला आहे.

## संक्षिप्त

### मुक्तेश्वर आश्रमात श्रावण मास उत्सव

**नांदेड :** येथील संत पाचलेगावकर महाराजांच्या आश्रमात श्रावण मास उत्सव सुरू आहे. या निमित्ताने महिनाभर अभिषेक होईल. पूजाअर्चा दर सोमवारी व महाप्रसाद आणि संत पाचलेगावकर यांच्या पुण्यतिथी निमित्ताने श्रावण शुद्ध एकादशी रोजी म्हणजे ५ऑगस्ट २०२५ रोजी गुरु पादुकेचा अभिषेक आणि रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे, अशी माहिती मुक्तेश्वर आश्रम यांनी दिली आहे.

### किडींचे योग्य व्यवस्थापन करावे

**नांदेड :** हुमणी अळी ही एक बहुभक्षी कीड असून महाराष्ट्रामध्ये होलोट्रीचीया सेरेंटा या प्रजातीमुळे प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर या पिकाचे नुकसान होते. पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी हुमणी अळी या बहुभक्षीय किडींचे योग्य व्यवस्थापन व नियोजन करावे असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे. पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी सायंकाळच्या वेळी शेतातील कडुलिंब, बोर आणि बाभुळ या झाडांचे निरीक्षण करावे. त्यासाठी झाडाखाली प्रकाश सापळे लावावे. एक मादी भुंगा नष्ट झाल्यास त्यापासुन तयार होणाऱ्या ४० ते ५० अळयांचा नाश होतो. सातत्याने हि किड येणाऱ्या भागात बाभुळ, कडूनिंब आणि बोर हयासारख्या झाडावर किटकनाशकाची पहिली फवारणी करावी.

### हरि-दर्शन संगीत समारोहाचे आयोजन

**नांदेड :** संगीतप्रेमींना स्वरमधुर भेट देणारा हरि-दर्शन संगीत समारोह यंदा पाचव्या वर्षात पदार्पण करीत आहे. लीला आर्टस् फाउंडेशन आणि चौसाळकर परिवारातर्फे कै. दर्शनानंद चौसाळकर आणि कै. प्रतीक चौसाळकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी आयोजित केला जाणारा हा सांगीतिक सोहळा यंदा विशेष ठरणार आहे.यंदाच्या कार्यक्रमात हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर गायक किशोरकुमार यांच्या जन्मदिनी म्हणजेच २ ऑगस्ट रोजी त्यांना आदरांजली वाहत 'दूर का राही' या गीतांचा, आठवणींचा आणि किस्स्यांचा विशेष कार्यक्रम सायंकाळी ७ वाजता नांदेड येथील कुसुम सभागृहात रंगणार आहे.

### आठवडी बाजारात रानभाज्यांना भाव

**नांदेड :** बुधवार आणि शुक्रवार या आठवडी बाजारात रानभाज्यांना मोठा भाव आला आहे.श्रावण महिन्यात सर्वाधिक रानभाज्या ग्राहकांना मिळतात. बाजारात रानभाज्या घेण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. १०,२० आणि ५० रुपयापर्यंत दुर्मिळ पाले भाज्या मिळू लागल्या आहेत.

## ग्रामीण भागात मजूर मिळेनात, शहरी भागात शोधाशोध

# मजुरीच्या दरात झाली वाढ

प्रतिनिधी | **किनवट**

तालुक्यातील काही वर्षांपासून सातत्याने वाढत असलेल्या महागाईमुळे शेतमजुरांच्या संख्येतही घट शेतात ने-आण करण्यासाठी वाहनही शेतकऱ्यांचेच पूर्वीच्या काळापेक्षा शेतकामांच्या दरात वाढ झाली आहे.

पुरुषांसाठी ४०० रुपये तर महिलांना ३०० रुपये असा दर आकारला जात आहे. तसेच लांबच्या पल्ल्यासाठी शेतमालकांना आपल्या वाहनाने शेतात मजुरांना पोहोचविण्याचे सूचित केले जात आहे. त्यामुळे मजुरांची वाढती शेतमालकांसाठी मोठी समस्या बनली आहे. मजुरी वाढल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भूर्दंड बसत आहे.

अशातच ज्यांना शक्य आहे ते शेतकरी घरच्या घरीच शेतीची कामे करीत आहेत. आधी कामासाठी मजूर शेतकऱ्यांच्या घराभोवती घिरट्या घालायचे, आता मात्र शेतकऱ्याला त्यांची विनवणी करावी लागत असल्याची वास्तविक परिस्थिती आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर शोधलेले तंत्रज्ञान जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे.

तेंव्हाच मजुरांच्या अनुपलब्धतेवर शेतकऱ्यांना तोडगा मिळेल, असे चित्र दिसत आहे. शेतकऱ्यांना त्याचा फटका सहन करावा लागत आहे. काही भागात मजूर मागतील, ती मजुरी देऊन त्यांना आपल्याकडे कामाला नेले जात आहे.

शेतीसाठी येणारा अमाप खर्च, त्यात अधिक क्षेत्र असल्याने मजुरांची व आर्थिक टंचाई मोठ्या प्रमाणात भासते. कामासाठी येण्याच्या विणवण्या, त्यातच शेतमजुरांच्या संख्येत होणारी घट, सातत्याने मजुरीच्या दरात होणाऱ्या वाढीमुळे शेती परवडेनासी झाल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात दिसत आहे.

शेतातील विविध कामे करण्यासाठी लागणाऱ्या शेतमजुरांच्या दरात वाढ झाली आहे.



### चोहूबाजुंनी शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी

मशागतीची बहुतांश कामे बैल व मजुरांऐवजी ट्रॅक्टरने केली जात आहेत. कारण शेतमजूर मिळणे दुरापास्त झाले आहे. अल्पभूधारक शेतकरी व भूमिहीन मजुरांना वर्षभर कामाच्या शोधात स्थलांतरित व्हावे लागत आहे. शेतकऱ्यांची चोहू बाजुने आर्थीक कोंडी होत आहे.

## धर्माबादेत कंत्राटी कामगारांचा मोर्चा

प्रतिनिधी | **धर्माबाद**

धर्माबाद नगर परिषदेमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांनी मागील काही महिन्यांपासून थकीत असलेल्या पगारामुळे तीव्र नाराजी व्यक्त केली असून, वेतनाची तात्काळ पूर्तता न झाल्यास २८ जुलै २०२५ पासून काम बंद आंदोलन सुरू केल्याची घोषणा केली आहे.

या पार्श्वभूमीवर कामगारांनी मुख्याधिकारी यांना निवेदन सादर करत स्पष्ट केले आहे की, मागील अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे त्यांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. विशेष म्हणजे महिला कामगारांना काही प्रमाणात वेतन मिळत असले तरी पुरुष कामगारांना वेतन देण्यात प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कामगारांनी असेही नमूद केले की, वेळोवेळी लेखी व तोंडी स्वरूपात निवेदन देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. त्यामुळे आता त्यांच्या संयमाचा बांध तुटला असून, जर चार ते सहा दिवसांच्या आत थकीत वेतन देण्यात आले नाही, तर कंत्राटी कर्मचारी काम बंद चालूच राहणार असा इशारा देण्यात आला .

या संभाव्य आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी व परिणामांसाठी प्रशासन जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा कामगारांनी दिला आहे.

## महादेव मंदिरात दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी



प्रतिनिधी | **मुखेड**

शहरातील हेमाडपंथी महादेव मंदिरांमध्ये श्रावण सोमवार निमित्त भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी गर्दी केली होती. पूजेच्या साहित्याची दुकाने थाटली असल्यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. दर्शनासाठी पहाटेपासून सुरू झालेली रांग रात्री उशिरापर्यंत पहावयास मिळत होती.

श्रावण महिन्याचा पहिला सोमवार असल्यामुळे मंदिर परिसरामध्ये स्वच्छता करण्यात आली होती. फुलांनी व रोषनाई करण्यात आली आहे. दि. २८ रोजी सोमवारी पहाटेपासून पूजा विधीला सुरुवात करण्यात आली. पाच वाजण्याच्या दरम्यान आकडा आरती करण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात महिला व पुरुष मंडळी उपस्थित होती. आरती झाल्यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षापासून भक्त पांडुरंग लोखंडे ही काकड आरती करीत आहेत. याचबरोबर वीरभद्र मठपती, बालाजी साताळे, कैलास चौधरी, गणेश कुंटेवाड, बालाजी पांचाळ, गणपत घोगरे व सचिन हे काकडा आरती मध्ये नित्य नियमाने सहभागी होऊन पूजा करीत असतात.

श्रावणसोमवार निमित्त हेमाडपंथी महादेव मंदिर परिसरामध्ये बेल फुल, नारळ, कमळाचे फूल व प्रसाद याच्या विक्रीची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली होती. काकड आरती पासूनच भक्तगन रांगेमध्ये दर्शनासाठी उभे टाकले होते. अशाच प्रकारे सायंकाळी उशिरापर्यंत भाविकांची गर्दी पहावयास मिळत होती.

## कुटीच्या पुनर्निमाणासाठी मदत करावी

### तपोवन बुद्धभूमीचे भंते बोधिधम्मो यांचे उपासकांना आवाहन

प्रतिनिधी | **कंधार**

तपोवन बुद्धभूमी गोळेगाव तालुका लोहा जिल्हा नांदेड येथील भन्ते बोधिधम्मो यांच्या कुटीला अचानकपणे आग लागून या आगीमध्ये कुटीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

वर्षावासाचा महिमा सध्या सुरू असल्याने भन्ते यांना राहण्यासाठी ही कुटीचे व्यवस्थित आणि चांगल्या प्रकारे पुनर्निमाण करण्यासाठी आर्थिक दानाची आवश्यकता आहे, तरी सर्व श्रद्धावान बौद्ध उपासक, उपासिका यांनी पुढे येऊन कुटीचे पुनर्निर्माण करण्यासाठी सर्वांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन भंते बोधीधम्मो तपोवन बुद्धभूमी गोळेगाव तालुका लोहा यांनी केले आहे. नांदेड जिल्ह्यातील तपोवन बुद्धभूमी गोळेगाव येथील भंते बोधीधम्मो यांची राहण्याची कुटीला दि.२४ जुलै रोजी दुपारी अचानकपणे आग लागली होती.त्यामुळे मोठे नुकसान झाले.



## गोकुंदा परिसरात स्मार्ट मीटरला नागरिकांची नापसंती

प्रतिनिधी | **किनवट**

किनवट व गोकुंदा शहरात गेल्या काही महिन्यापासून स्मार्ट मीटर च्या नावाखाली जुने मीटर परस्पर काढून नवीन मीटर बसविले जात आहे.या नवीन मीटर मुळे अनेक ग्राहकांना सव्वा बिले येत असल्यामुळे विज ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

वीज कायदा २००३ च्या कलम ५५ नुसार स्मार्ट वीज मीटर लावणे बंधनकारक नाही असे महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे म्हणणे आहे.याबाबतची माहिती त्यांनी सर्व वीज ग्राहकांना व वीज वितरण कंपनीच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिली आहे.

वीज मीटर बदलण्यासाठी येणारे ठेकेदार आहेत.ती एक नोडल एजन्सी आहे.या नोडल एजन्सीला आपण वीज मीटर लावू नये ,असे स्पष्ट सांगावे.त्यांनी जर हे अमान्य केले. तर त्यांना हाकलून लावावे कारण नोडल एजन्सीला हाकलून लावणे हा सरकारी कामात अडथळा नाही. असेही संघटनेने स्पष्ट केले आहे .कोणत्याही कायद्यानुसार सरकारी कामात अडचण आणणे ही केस आपल्यावर याबाबतीत लागू होऊ शकत नाही.स्मार्ट मीटर लावायला आलेल्या हे मीटर लावणे आवश्यक असल्याबाबत महाराष्ट्र सरकारच्या आदेशाची जीआर प्रत मागावी हे तुम्हाला देऊन शकत नाही.तअसे वीज ग्राहक संघटनेने म्हटले आहे.हे मीटर लावणे सर्वांनी ताबडतोब बंद करावे.कारण या मीटरच्या वेगवान फिरण्याने विज बिल भरता भरता आपल्याला हकनाक त्रास होणार आहे.एकदा का जर हे मीटर आपण लावले तर त्याला पुन्हा कोणीही परत काढू शकणार नाही.याची सर्वांनी जाण ठेवावी.असे महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने म्हटले आहे. हे मीटर भविष्यात विचार जीपीएस सिस्टीम मध्ये होणार आहे .त्यामुळे राज्यात याचा विरोध सुरू असताना तुमच्या घरी येऊन, जबरदस्ती काम कंपनीने करीत आहे.जीनियस या कंपनीचे मीटर ज्यांच्या घरी बसविले आहे .त्यांना आता दुप्पट बिल येऊ लागते आहे.

### वीज ग्राहकांना वाढीव बिलाचा शॉक

स्मार्ट मीटर बसविणे अनिवार्य नाही.म्हणून हे मीटर आपल्या घरी बसून घेऊ नका असे महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.याचा अनुभव गोकुंदा व किनवट शहरातील अनेक वीज ग्राहकांना आला आहे. पहिले पेक्षा पाच पाच पट वीज बिल जास्त येत आहे.

## कृत्रिम खत टंचाई विरोधात कारवाई करा

### सभापती गजानन मुंडे यांची मागणी

प्रतिनिधी | किनवट

युरीया खतांची कृत्रीम टंचाई करुन जादा दराने विक्री चालू असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे यांनी तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड यांच्याशी संपर्क साधून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही आणि शेतकऱ्यांना युरीयासह अन्य मिश्र खताचा गरजेनुसार पुरवठा होण्याच्या दृष्टीने संवाद साधला आहे.

कृषी अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशीसाठी लवकरच पाऊल उचलणार असल्याचे आश्वाशीत केले.रासायनिक खतांची केलेली कृत्रीम टंचाई शेतकऱ्यांसाठी अतिशय घातक ठरणारी आहे. आज युरीया खताची आवश्यकता असतांना साठेबाजी करून दुप्पट दराने विक्री करून आडवलेल्या शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री लावल्या जात आहे.

किनवट तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची सुत्रे चंद्रकांत निमोड यांच्याकडे आहेत. सद्या खरीप हंगाम चालू आहे. मध्यंतरी पावसाने दडी मारल्याने खताचा दुसरा हप्ता राहिलेला होता. गेल्या तीन दिवसापासून पावसाची सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांनी कृषी केंद्रावर धाव घेतली. युरीया खताची मागणी वाढली आहे. शेतकऱ्यांचा अंदाज घेत कृषी सेवा केंद्रचालकांनी खताची साठेबाजी करन वृत्रीम टंचाई निर्माण केली आहे. शेतकऱ्यांची ऐनवेळी अशी अडवणूक केली जाते. अशावर कृषी विभागाने कारवाई करावी अशा मागणी मुंडे यांनी केली आहे.

## खतांच्या किमतीत झाली मोठी वाढ

प्रतिनिधी | **नांदेड**

जिल्हयात खरीप हंगामाचे क्षेत्र मोठे आहे. या हंगामात पिकांची मोठी वाढ झाली आहे. रासायनिक खंताच्या किमती वाढू लागल्या आहेत. कृषी केंद्रावर गेलेल्या शेतकऱ्यांना खतवाढीचा फटका सहन करावा लागतो आहे. केळी, कपाशी या पिकांवर पोटॅश फवारणीसाठी पॉटॅशची थैली आठराशे रुपयांना मिळू लागली आहे. मागील वर्षीपेक्षा या खताच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्या सोबतच रासायनिक खते वाढली आहेत.

## पालकांनी न्यूनगंड न बाळगता दिव्यांगांना आत्मसन्मानाने जगण्याची संधी द्यावी

### बापू दासरी यांचे भावनिक आवाहन

प्रतिनिधी | **नांदेड**

आपल्या दिव्यांग पाल्यांचा न्यूनगंड न बाळगता, त्यांना आत्मसन्मानाने आणि आनंदाने जगण्याची संधी द्या,फ्क असे भावनिक आवाहन सेवानिवृत्त समाजकल्याण अधिकारी बापू दासरी यांनी केले.

शहरातील मगनपुरा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात सोमवारी बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी अभिमुखता शिबीर व पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे पॅनल सदस्य ॲड. एच. आर. जाधव होते. ॲड. बी. डी. गावंडे, ॲड. चव्हाण, ॲड. पाटील यांचीही विशेष उपस्थिती होती. विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन निर्मल यांनी शाळेचे प्रतिनिधित्व केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना बापू दासरी म्हणाले, दिव्यांग विद्यार्थी ही कोणतीही कमतरता नसून परमेश्वराची एक विशेष देणगी आहे. परमेश्वराने आपल्यावर विश्वास ठेवून ही मुले आपल्या कुटुंबात जन्माला घातली आहेत. त्यांच्या संगोपनाची जबाबदारी आपण अभिमानाने घ्यायला हवी. या भावनिक शब्दांनी उपस्थित पालक भारावून गेले. या वेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. चालू वर्षातील अभ्यासक्रम, नियोजित उपक्रम, तसेच भविष्यातील शिक्षण व पुनर्वसन योजनांवर पालकांशी संवाद साधण्यात आला. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या कायदेशीर हक्कांबाबत ॲड. पाटील , ॲड. चव्हाण आणि ॲड. जाधव यांनी मार्गदर्शन करत पालकांना विविध सरकारी योजनांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम. आर. गोडबोले यांनी केले तर आभार प्रदर्शन मनिषा तिवारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. शाळेच्या वतीने दरवर्षी अशा तीन पालक सभांचे आयोजन करून पालक-शाळा समन्वयातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.



### पालकांशी सुसंवाद

सविस्तर आढावा घेण्यात आला. चालू वर्षातील अभ्यासक्रम, नियोजित उपक्रम, तसेच भविष्यातील शिक्षण व पुनर्वसन योजनांवर पालकांशी संवाद साधण्यात आला.

## बदलत्या काळानुसार अभ्यासक्रम असावा : चव्हाण

प्रतिनिधी| **नवीन नांदेड**

काळ झपाट्याने बदलत आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेला दुर्लक्षित करून चालणार नाही.त्यामुळे यापुढील काळात बदलत्या काळानुसार अभ्यासक्रम विद्यार्थीपुरक असायला हवा असे प्रतिपादन सुप्रसिद्ध उद्योजक व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, व्यवस्थापन समिती सदस्य नरेंद्र चव्हाण यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभ्यासक्रमावर आधारित एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ.रावसाहेब शेंदारकर, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मा.मा. जाधव, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सुजितसिंह परिहार, पर्यावरण शास्त्राचे अभ्यासक मंडळाचे अध्यक्ष डॉ.वसंत वाघ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, समन्वयक डॉ.एस.बी. मिर्झा, संयोजक डॉ. शंकर विभुते, डॉ.लक्ष्मण काळे, डॉ. राजकुमार पवळे, सहसंयोजक डॉ. हनुमंत भोपाळे, डॉ.केदार सोळुंके उपस्थित होते. शंकर विभुते यांनी तर आभार डॉ.राजकुमार पवळे मानले. कार्यक्रमात अभ्यासकांचा सहभाग होता. यावर गांभीर्याने चर्चा केली. उदघाटन सत्राचे सूत्रसंचालन, संयोजक डॉ. विभुते यांनी तर आभार डॉ.राजकुमार पवळे यांनी मानले.



**समस्या** शहरातील स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ आला अडचणीत

# शिधापत्रिकांची केवायसी ठरू लागली जनतेची डोकेदुखी

प्रतिनिधी | **किनवट**

शासनाने सर्व शिधापत्रिकाधारकांचे ईकेवायसी करण्याचे आदेश दिले. परंतु, ईकेवायसी करताना रेशन दुकानदारांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या अडचणी सुटत नसल्याने ईकेवायसी प्रक्रिया डोकेदुखी ठरू लागली आहे. हे प्रश्न सोडविण्याची मागणी स्वस्त धान्य दुकानदार व परवानाधारक महासंघाने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे नुकतीच निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य शासनाने सर्व शिधापत्रिकाधारकांना १५ ऑगस्टपूर्वी ईकेवायसी करण्याचे निर्देश दिले आहेत.अन्यथा रेशन धान्य बंद करण्याचा इशारा दिला आहे. नागरिक ई केवायसी करण्यासाठी रेशन दुकानदारांकडे जात आहेत.

ईकेवायसी करताना रेशनदुकानदारांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहेत. पाच वर्षांखालील मुलांचे आधार कार्ड, शाळेतर्फे देण्यात आले होते, त्या वेळेस मुलांच्या पाल्यांचे फिंगरप्रिंट घेऊन मुलांचे आधार कार्ड देण्यात आले आहे. परंतु सदरील मुलांचे आधार कार्ड पाच वर्षानंतर अपडेट न केल्याने अशा लहान मुलांचे केवायसी होत नाही. ऑनलाईनमध्ये चुकीची माहिती फिड झाल्याने अशा लाभार्थ्यांचे केवायसी करण्यास अडथळे निर्माण होत आहे. चुकीची दुरुस्ती करण्यासाठी परवानाधारकांनी तहसील कार्यालयात आधार कार्डसह फाईल दाखल केल्या आहेत. परंतु, जोपर्यंत ऑनलाईनमध्ये चुकीची दुरुस्ती तहसीलदारांमार्फत होत नाही, तोपर्यंत परवानाधारकांची केवायसी करता येत नाही. त्यातच गेल्या काही दिवसांपासून नेटसेवा सुरळीत चालत नसल्याने दुकानदारांना केवायसी करण्यास अडथळे निर्माण झाले आहे. वयोवृद्ध व हातमजूरांचे बोटाचे ठसे ई पॉज मशिनवर त्यांचे फिंगरप्रिंट मॅच होत नसल्याने अशा लाभार्थ्यांचे केवायसी करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्या दूर करण्याची मागणी आहे. दरम्यान गेल्या अनेक दिवसांपासून रेशनचे लाभार्थी अतिशय त्रस्त आहेत. केवायसी करताना फिंगरप्रिंट येत नाही. किंबहुना नेटच्या समस्यांमुळे केवायी प्रक्रिया पूर्ण होत नाही. धान्य वाटप करावे की केवासी करावी असा प्रश्न पडला आहे.



### कायमस्वरुपी नेटची समस्या सोडवा, पुरवठा अधिकाऱ्यांकडे मागणी

शासनाने जून-जुलै व ऑगस्ट या तीन महिन्याचे अन्न धान्य एकाच वेळी वाटप करण्याचे आदेश केले आहे. परंतु, अन्नधान्याचा पुरवठा दुकानदारांना सुरळीत व वेळेवर होत नसल्याने सदरील धान्य एकाच वेळी तीन महिन्याचे धान्य वाटप करण्यास अडथळे निर्माण झाले आहे. तसेच नेटसेवा वेगवान नसल्याने परवानाधारकांचे आजपर्यंत फक्त २५-३० टक्के लाभार्थ्यांना धान्याचे वाटप झालेले आहे. ७० टक्के लाभार्थ्यांना धान्याचे वाटप करणे बाकी आहे. त्यामुळे कायमस्वरुपी नेटची समस्या सोडविण्यात यावी, अशी मागणी मिलिंद सर्पे यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे नुकतीच केली आहे.

## युवकाची आत्महत्या

प्रतिनिधी | **मुखेड**

अवधूत माकणे या युवकाची बेडशीटने गळफास लावलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यास घरातील मंडळींनी उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले असता त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ही घटना होनवडज गावामध्ये घडली.


**CHANGE IN NAME**

My Old Name is SHINDE SAINATH RAJIV Which now I am. Changing as New Name. SAINATH RAJU SHINDE Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.

**:: Address ::**

AT. JOMEGAON POST UMRA TQ. LOHA
DIST NANDED -431708
MOB ; 9923346638

संपादकीय

# मतदारयादीची पडताळणी : वाद आणि राजकारण !

बिहारमधील विधानसभा निवडणुकीचे पडघम राजकीय पटलावर वाजायला सुरुवात झाली आहे. नेमके याच दरम्यान निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या चार महिने आधी राज्यातील मतदारयादीची विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) म्हणजे मतदारांची पडताळणी सुरू केली आहे. मतदारयादीतून कोणताही पात्र नागरिक वगळला जाणार नाही आणि कोणताही अपात्र व्यक्ती मतदारयादीत समाविष्ट होणार नाही याची खात्री करणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. दावे आणि आक्षेपांचे निराकरण झाल्यानंतर, अंतिम मतदारयादी ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. या मोहिमेचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून एक जुलै रोजी जनगणनेची प्रक्रिया सुरू झाली. निवडणूक आयोगाच्या याच मोहिमेवर सध्या केवळ बिहारच नाही तर संपूर्ण देशभरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. संसदेचे कामकाज सुद्धा या मुद्दावरुन प्रभावित झाले. पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात विरोधकांनी या मुद्दावरुन सरकारने उत्तर द्यावे असे म्हणत कामकाज होऊ दिले नाही. याच पार्श्वभूमीवर मतदार पुनर्पडताळणी मोहिमेचा अहवाल समोर आला आहे. निवडणूक आयोगाकडून रविवारी हा अहवाल अधिकृतपणे जाहीर झाला. या अहवालातील आकडे डोळे पांढरे करणारे आहेत. मतदारयादीतील तब्बल ६५ लाखांहून अधिक मतदारांचा ठावठिकाणा सापडत नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. आयोगाच्या माहितीनुसार, बिहारमध्ये २४ जून अखेरीस ७ कोटी ८९ लाख मतदार नोंदणीकृत होते. पुनर्पडताळणी मोहिमेअंतर्गत ७ कोटी २४ लाख मतदारांनी आपले ओळख पटवणारे फॉर्म भरले. या मोहिमेत २५ जुलैअखेरपर्यंत ९१.६९ टक्के मतदारांनी सहभाग घेतला. मोहिमेमध्ये तब्बल २२ लाख म्हणजे एकूण मतदारांपैकी २.८३ टक्के मतदारांचा मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे. तर ३६ लाख मतदार त्यांनी यापूर्वी नोंदविलेल्या पत्यावर सापडले नाहीत किंवा ते कायमस्वरुपी स्थलांतरित झाले असावेत, असे दिसून आले. तर जवळपास सात लाख मतदारांची एकापेक्षा अधिक मतदारसंघात नोंदणी असल्याचेही या मोहिमेत आढळून आले आहे. याचा अर्थ तब्बल ६५ लाख मतदारांचा ठावठिकाणा लागलेला नाही. २४ जून ते २५ जुलै या महिनाभरात राबविण्यात आलेल्या मोहिमेअंतर्गत मतदारयादीत अशा त्रुटी आढळून आल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. ज्या मतदारांचा ठावठिकाणा लागलेला नाही ते इतर राज्यांमध्ये मतदार झाले असावेत, त्यांची बाहेर पडण्याची इच्छा असावी, वेळेत अर्ज दिला नसावा किंवा त्यांना पुन्हा मतदार म्हणून नोंदणी करायची असेल, असे खुलासा आयोगाने केला आहे. असे असले तरी आयोगाकडून जाहीर केलेल्या आकड्यांची पुन्हा पडताळणी केली जाणार आहे. मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून या मतदारांचा ठावठिकाणा शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कोणताही मतदार या प्रक्रियेतून सुटू नये, यासाठी आयोगाकडून हे प्रयत्न केले जाणार आहेत. गेला महिना या मुद्दावरुन आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना हा आकडा समोर आल्याने सर्वच राजकीय पक्षांना हादरा बसला आहे. याचा फटका निवडणुकीत कोणत्या पक्षाला सर्वाधिक बसणार, याबाबत आता तर्कवितर्क लढवले जाऊ लागले आहेत. प्रत्यक्ष आकडे समोर आल्यानंतर ठावठिकाणा लागत नसलेले हे ६५ लाख मतदार मतदारयादीतून वगळणार का, याबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. याच दरम्यान या मोहिमेतील अनियमिततेवरही आरोप केले जात आहेत. बूथ लेव्हल ऑफिसर स्वतःच मतदार गणना फॉर्मवर हस्ताक्षर करत असल्याचे आढळले आहे. काही ठिकाणी मृत व्यक्तींचेही फॉर्म भरले गेले, तर काही नागरिकांनी फॉर्म भरले नसतानाही त्यांना तुमचे फॉर्म पूर्ण झाले आहेत असा मेसेज आला आहे. अनेक मतदारांनी तर आम्ही कधीही बीएलओला भेटला नाही, कुठल्याही कागदावर स्वाक्षरी केली नाही तरीही त्यांचे फॉर्म ऑनलाईन अपलोड झाले आहेत, अशा तक्रारी केल्या आहेत. खोटी स्वाक्षरी करून फॉर्म भरले जात असल्याचेही आरोप आहेत. तथापि, या प्रक्रियेत कोणतीही अनियमितता झाली नाही. ही प्रक्रिया मतदारयादी अद्ययावत ठेवण्यासाठी आवश्यक आहे, जेणेकरून अयोग्य नावे हटवता येतील, असा युक्तीवाद निवडणूक आयोगाने केला आहे. मतदारयादीत अपात्र नावांचा समावेश करणे म्हणजे एखाद्या दोषी व्यक्तीला सुटका मिळण्यासारखे आहे, तर पात्र मतदाराला वगळणे म्हणजे एका निष्पाप व्यक्तीला त्रास सहन करावा लागण्यासारखे आहे. या दोन्ही शक्यता लोकशाहीला कलंक ठरतील. म्हणून, मतदारयादीची कसून तपासणी आणि पडताळणी केली पाहिजे असा निवडणूक आयोगाचा आग्रह आहे. त्यातूनच बिहारमधून सुरु झालेली ही मोहिम आता आगामी काळात संपूर्ण देशभरात राबवली जाऊ शकते. सर्वप्रथम बिहार यासाठी निवडले, की राज्यात आगामी तीन महिन्यांत निवडणुका आहेत. राजकीय पक्षांकडून या मोहिमेवर प्रश्न उपस्थित करणे सहाजिक आहे. निवडणूक आयोगाने हे काम चुकांशिवाय पूर्ण करण्यासाठी पुरेसे सुरक्षा उपाय योजले आहेत याची खात्री सगळ्यांना करुन द्यायला हवी. मतदार वगळण्याच्या किंवा नवीन मतदार भर घालण्याच्या चुका टाळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी डोळ्यात तेल घालून अधिकाधिक सक्रियपणे सहभागी होणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, वैध कागदपत्रांच्या यादीतून आधार कार्ड वगळल्याने अनेकांसाठी, विशेषतः वंचितांसाठी समस्या निर्माण होऊ शकतात. गणनेच्या पहिल्या टप्प्यातील वास्तविकता विचारात घेतल्यानंतर, निवडणूक आयोगाने दावे आणि हरकतींच्या टप्प्यात प्रक्रिया योग्यरित्या तयार करावी, जेणेकरून कोणताही पात्र नागरिक वैध कागदपत्रांच्या यादीतून कोणताही कागदपत्रे सादर करण्यास असमर्थतेमुळे वगळला जाणार नाही याची खात्री करावी. स्थलांतरितांना यादीतून वगळू नये कारण त्यामुळे मोठ्या प्रमाणात मतदारयादीतून वगळले जाऊ शकते. अशा अनेक स्थलांतरितांनी त्यांच्या जन्म/पालनाच्या ठिकाणी त्यांच्या पसंतीनुसार मतदानाचा अधिकार वापरला आहे आणि तो करत राहिला पाहिजे. २०१० मध्ये झालेल्या निवडणूक कायद्यातील दुरुस्तीनुसार, रोजगार, शिक्षण किंवा इतर कारणांमुळे दीर्घकाळासाठी भारताबाहेर स्थलांतरित झालेल्या अनिवासी भारतीयांना पासपोर्टनुसार त्यांचा पत्ता ज्या मतदारसंघात आहे त्या मतदारसंघात नोंदणी करण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार आहे. वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये एकाच व्यक्तीसाठी डुप्लिकेट मतदार ओळखपत्रांचा मुद्दा आधार सीडिंगद्वारे सोडवला पाहिजे ज्यासाठी निवडणूक आयोगाने सल्लामसलत प्रक्रिया राबवली पाहिजे. या प्रक्रियेद्वारे मतदारयादीतून लाखो मतदारांची नाव काढून टाकण्यात येत आहेत. याचा परिणाम विशेषकरून एका समुदायावर आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गांवर होईल, असा विरोधकांचा मुळ आक्षेप आहे. भारताचे संविधान हे भारताच्या लोकशाहीची जननी आहे. हे लक्षात घेऊन निवडणूक आयोग या मोहिमेच्या माध्यमातून मृत मतदार, कायमचे स्थलांतरित मतदार, दोन ठिकाणी मतदान केलेले मतदार, बनावट मतदार किंवा परदेशी मतदारांच्या नावाने बनावट मते टाकण्याचा मार्ग बंद करत आहे. प्रथम बिहारमध्ये, नंतर संपूर्ण देशात हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

# प्राचीन शिव मंदिराच्या वादातून आग्रेय आशिया अशांत



**सुमारे १२०० वर्षाचा इतिहास असलेल्या शिव मंदिराच्या दाव्यावरून थायलंड व कंबोडिया या दोन शेजारी देशांत पुन्हा एकदा संघर्ष पेटला आहे. या मंदिरावर दोन्ही देश दावा सांगतात. या प्रकरणात आंतरराष्ट्रीय न्यायालयानेही निर्णय दिलेला आहे. तरीही या दोन देशात पुन्हा पुन्हा संघर्ष पेटतो. ताज्या संघर्षाने अमेरिकेला आग्रेय आशियात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली आहे. या वादामागील पार्श्वभूमिचा आढावा घेणारा हा लेख.**

थायलंड आणि कंबोडिया यांच्यातील सीमेवर. गेल्या गुरुवारच्या सकाळपासून दोन्ही देशांच्या सैन्यांमध्ये गोळीबार सुरू आहे, थायलंडने कंबोडियाच्या लष्करी तळांवर हवाई बॉम्बहल्ला केल्याचा दावा केला आहे. हा वाद एक शतकापासून जुना असून या वादाची मुळे एक शतकाहून अधिक जुनी असून ती एका ऐतिहासिक शिवमंदिराशी जोडलेली आहेत. हा वाद प्रामुख्याने ११व्या शतकातील प्रेह विहार मंदिरावरून सुरू झाला आहे. या शिव मंदिराची निर्मिती ११ व्या शतकात झाली असली तरी त्याचा ऐतिहासिक संबंध ९ व्या शतकापासून आढळतो. हे मंदिर उत्कृष्ट वास्तुकला आणि कोरीव दगडांच्या बांधकामाचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

२००८ मध्ये कंबोडियाने या मंदिराची युनेस्को जागतिक वारसा स्थळ म्हणून नोंदणी करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तणाव वाढला होता. थायलंडने यास तीव्र विरोध दर्शवला. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये अनेक चकमकी झडल्या. त्यात सैनिक आणि नागरिकांचा मृत्यू झाला. मे महिन्यात एका संघर्षात एका कंबोडियन सैनिकाचा मृत्यू झाल्याने दोन्ही देशांमधील तणाव आणखी वाढला आणि दोन्ही देशातील संबंध गेल्या दशकातील सर्वात जास्त बिघडले आहेत.

**आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा निर्णय**

हे ठिकाण कंबोडियन नागरिकांसाठी धर्म आणि श्रद्धेचे केंद्र आहे. कंबोडियाने आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे मागणी केली होती की, त्यांनी या मंदिरावरील अधिकाराबाबत निर्णय द्यावा आणि १९५४ पासून तेथे तैनात असलेले सैन्य थायलंडला काढून घेण्याचे आदेश द्यावेत. कंबोडियाने आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे तक्रार केली होती की, थायलंडने प्रेह विहार मंदिराच्या अवशेषांनी वेढलेल्या त्यांच्या भूभागाचा एक भाग ताब्यात घेतला आहे. या खटल्यात आंतरराष्ट्रीय न्यायालयाने सखोल अभ्यास करून निर्णय दिला. न्यायालयाने, १९०४ च्या फ्रँको-सियामी करारानुसार या वादग्रस्त क्षेत्राचे जलरेषेनुसार सीमांकन करण्यात आल्याचे विचारात घेतले. या संयुक्त सीमांकन आयोगाने काढलेल्या नकाशात मंदिर कंबोडियन प्रदेशात असल्याचे स्पष्टपणे दर्शवले होते. थायलंडने न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रावर प्रारंभिक आक्षेप नोंदवले. ते न्यायालयाने २६ मे १९६१ रोजी फेटाळून लावले होते. १५ जून १९६२ रोजी आंतरराष्ट्रीय न्यायालयाने प्रेह विहार मंदिर वादावर आपला ऐतिहासिक निर्णय दिला. कंबोडियन नागरिकांसाठी हे ठिकाण धर्म आणि श्रद्धेचे केंद्र आहे, अशी तक्रार कंबोडियाने आंतरराष्ट्रीय न्यायालयात तक्रार केली होती. थायलंडने असा युक्तिवाद केला की, ते नकाशा स्वीकारण्यास बांधील नाहीत. त्यांनी तो नकाशा कधीही स्वीकारला नव्हता किंवा स्वीकारला असेल तर तो चुकीने स्वीकारला. मात्र, थायलंडने प्रत्यक्षात नकाशा स्वीकारल्याचे न्यायालयाला आढळले. हे मंदिर कंबोडियन प्रदेशात असल्याचा निष्कर्ष न्यायायाने काढला. थायलंडने नकाशा स्वीकारलेल्या नकाशानुसार मंदिर असून ते कंबोडियच्या प्रदेशातच आहे, असे न्यालयाने आपल्या निकालात नमूद केले होते. न्यायालयाने थायलंडला १९५४ पासून तेथे तैनात असलेले कोणतेही लष्करी किंवा पोलिस सैन्य मागे घेण्याचे आणि मंदिरातून काढून टाकलेल्या सर्व वस्तू कंबोडियाला परत करण्याचे आदेश दिले.

**दोन्ही देशीतील सद्यस्थिती**

सध्याचा तणाव एका थाई सैनिकाला भूसुरुंग स्फोटात दुखापत झाल्यापासून सुरू झाला आहे. त्यानंतर थायलंडने कंबोडियातील आपले राजदूत परत बोलावले. थायलंडने कंबोडियावर ड्रोन वापरून आपल्या सैनिकांवर नजर ठेवल्याचा आरोप केला आहे, तर कंबोडियाने थायलंडवर नागरी भागांवर गोळीबार केल्याचा आणि क्लस्टर दारूगोळा वापरल्याचा आरोप केला आहे. क्लस्टर दारूगोळ्याच्या वापरावर जगभरातील बहुतेक देशांनी बंदी घातली आहे. दोन्ही देशांच्या सीमेवरील १२ विभागात जोरदार चकमकी होत आहेत. थायलंडने कंबोडियावर नागरी भागांवर गोळीबार केल्याचा आरोप केला आहे आणि त्यांच्या रॉकेटच्या प्रभावाखाली येणारी सर्व गावे रिकामी केली आहेत. थायलंडचे कार्यवाहक पंतप्रधान फुमथम वेचायचाई यांनी हा संघर्ष युद्धात बदलू शकतो असा इशारा दिला आहे. या संघर्षामुळे हजारो लोक विस्थापित झाले आहेत आणि दोन्ही देशांनी सीमेवर सैन्य मोठ्या प्रमाणावर तैनात केले आहे. तसेच एकमेकांवर आर्थिक निर्बंध लादले आहेत. कंबोडियाने थायलंडमधून फळे आणि भाज्या आयात करण्यावर बंदी घातली आहे आणि वीज व इंटरनेट सेवा घेणेही बंद केले आहे.

**आंतरराष्ट्रीय स्तरावरून आवाहन**

जागतिक स्तरावरून अमेरिका, चीन, ऑस्ट्रेलिया, युरोपियन युनियन आणि फ्रान्स यांसारख्या देशांनी दोन्ही राष्ट्रांना आपसातील शत्रुत्व त्वरित थांबवावे, नागरिकांचे संरक्षण करावे आणि संघर्ष शांततापूर्ण मार्गाने सोडवावा, असे आवाहन केले आहे. संवाद आणि सल्लामसलतीद्वारे समस्या सोडवण्याची अपेक्षा चीनने व्यक्त केली आहे. हा संघर्ष केवळ दोन देशांमधील सीमावाद नसून एका प्राचीन धार्मिक स्थळावरून निर्माण झालेला ऐतिहासिक आणि भावनिक मुद्दा आहे. सध्या तरी त्याचा परिणाम हजारो नागरिकांच्या जीवनावर होत आहे.

**(दैनिक सत्यप्रभा डेस्क)**

निमित्त

# महाराष्ट्रातील नागपंचमी



नागपंचमी हा श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी साजरा होणारा हिंदू धर्मियांचा सण आहे. विशेषतः महाराष्ट्रात या सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा सण केवळ एक धार्मिक विधी नसून निसर्गाप्रती कृतज्ञता, पर्यावरणाचे रक्षण आणि सर्पांविषयी आदर व्यक्त करण्याचा सोहळा आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेली ही परंपरा महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे. नागपंचमीचा सण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने साजरा केला जातो. या दिवशी नागदेवतेची पूजा केली जाते. नाग हे शिवाचे भूषण मानले जातात आणि विष्णूचे शयनस्थान म्हणूनही त्यांना आदराने पाहिले जाते. सर्पांना शेतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे मित्र मानले जाते, कारण ते उंदरांसारख्या पिकांचे नुकसान करणाऱ्या प्राण्यांवर नियंत्रण ठेवतात. त्यामुळे, सर्पांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्यापासून स्वतःचे रक्षण होण्यासाठी या दिवशी त्यांची पूजा केली जाते.

या दिवशी स्त्रिया विशेषतः उपवास करतात. पहाटे लवकर उठून स्नान करून नागदेवतेची मूर्ती किंवा प्रतिमेची पूजा केली जाते. काही ठिकाणी जीवंत नागाची पूजा करण्याची प्रथा असली तरी, सर्पमित्रांकडून जनजागृती केल्यामुळे आणि वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे आता अनेक ठिकाणी मातीच्या नागांची मूर्ती किंवा नागांच्या चित्रांची पूजा केली जाते. नागपंचमीच्या दिवशी नागाच्या प्रतिमेला किंवा मूर्तीला दूध, लाव्हा (साळीच्या लाह्या), दूर्वा, चंदन, फुले आणि हळद-कुंकू अर्पण केले जाते. स्त्रिया नागदेवतेला दुधाचा नैवेद्य दाखवतात. काही ठिकाणी घराच्या भिंतींवर नागाची चित्रे काढली जातात आणि त्यांची पूजा केली जाते. या दिवशी नांगरणे, खोदकाम करणे किंवा जमिनीवर कुठलेही असे काम करणे टाळले जाते. यामुळे चुकून एखाद्या सर्पाला इजा होऊ शकते. विहिरी किंवा तलाव यांसारख्या जलस्रोतांच्या ठिकाणीही नागाची पूजा करण्याची प्रथा आहे. नागाचा संबंध पाण्याशी मानला जातो. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात नागपंचमीचा उत्साह विशेष असतो. स्त्रिया झोके खेळतात, पारंपरिक गाणी गातात आणि सणाचा आनंद साजरा करतात. गावागावांमध्ये भजन-कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. नवीन लग्न झालेल्या स्त्रिया पहिल्या नागपंचमीला आपल्या माहेरी येतात आणि कुटुंबासोबत हा सण साजरा करतात. लहान मुलांनाही या दिवशी नागांच्या कथा सांगितल्या जातात, ज्यामुळे त्यांच्या मनात निसर्गाबद्दल आणि प्राणीमात्रांबद्दल आदर निर्माण होतो.

काळाच्या ओघात नागपंचमी साजरी करण्याच्या पद्धतीत काही बदल झाले आहेत. पूर्वी काही ठिकाणी जीवंत नागांना पकडून त्यांची पूजा केली जात असे, ज्यामुळे सर्पांना त्रास होत असे आणि त्यांच्या जीवाला धोका निर्माण होत असे. परंतु, आता वन्यजीव संघटना आणि सर्पमित्र यांच्या प्रयत्नांमुळे जनजागृती झाली आहे. नागाला दूध पाजणे ही अंधश्रद्धा असून, दूध पचण्यास सर्पांना त्रास होतो हे लोकांना समजावून सांगितले जात आहे. आजही महाराष्ट्रात नागपंचमीचा सण मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहात साजरा केला जातो. बदलत्या काळानुसार साजरी करण्याच्या पद्धतीत सकारात्मक बदल होत असले तरी, या सणामागची श्रद्धा आणि निसर्गाप्रतीचा आदर कायम आहे. हा सण आपल्याला आपल्या परंपरांचे जतन करण्यास आणि पर्यावरणाबद्दल अधिक जागरूक राहण्यास प्रेरणा देतो.

जगाच्या पाठीवर

# पासपोर्ट इंडेक्समध्ये भारताची झेप

हेन्ली पासपोर्ट इंडेक्समध्ये भारतीय पासपोर्टने आतापर्यंतची सर्वात मोठी झेप घेतली आहे. भारताचा पासपोर्ट आठ स्थानांची प्रगती करत ७७ व्या स्थानावर पोहोचला आहे तो गेल्या वर्षी ८५ व्या स्थानावर होता. भारतीय पासपोर्टधारक आता ५९ देशांमध्ये व्हिसा-मुक्त किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हल सुविधेसह प्रवास करू शकतात. ही संख्या गेल्या वर्षी ५७ होती. भारतीय पासपोर्टधारकांना मलेशिया, इंडोनेशिया, मालदीव आणि थायलंड येथे व्हिसा-मुक्त प्रवेश मिळतो. तर मकाऊ आणि म्यानमार व्हिसा-ऑन-अरायव्हल सुविधा देतात. अलीकडेच फिलिपिन्स आणि श्रीलंका हे दोन नवीन देश व्हिसा-मुक्त प्रवासाच्या यादीत जोडले गेले आहेत. भारतीय पासपोर्टसह व्हिसाशिवाय प्रवास करता येणाऱ्या काही प्रमुख देशांमध्ये अंगोला, बार्बाडोस, भूतान, ब्रिटिश व्हर्जिन आयलंड, डोमिनिका, फिजी, ग्रेनाडा, हैती, इराण, जमैका, कझाकस्तान, मॉरिशस, नेपाळ, रवांडा, सेनेगल, त्रिनिदाद आणि टोबॅगो, तसेच वानुआतु यांचा समावेश आहे. भारतासाठी यादीत दोन देशांची वाढ किरकोळ वाटत असली तरी, त्याचे राजनैतिक महत्त्व मोठे आहे. सिंगापूरचा पासपोर्ट प्रथम, त्यानंतर जपान आणि दक्षिण कोरियाच्या पासपोर्टाचा नंबर लागतो. ऑस्ट्रिया, बेल्जियम, लक्झेंबर्ग, नेदरलँड्स, नॉर्वे, पोर्तुगाल आणि स्वीडन चौथ्या स्थानावर आहेत, तर




न्यूझीलंड, ग्रीस आणि स्वित्झर्लंड पाचव्या स्थानावर आहेत. सामान्यतः खूप मजबूत मानले जाणाऱ्या ब्रिटनच्या पासपोर्टच्या रँकिंगमध्ये घट होऊन तो नवव्या क्रमांकावर तर अमेरिका दहाव्या क्रमांकावर घसरला आहे. अमेरिकेचा गेल्या वर्षी नववा क्रमांक होता. चीनने २०१५ पासून ३४ स्थानांची मोठी झेप घेतली असून ते ९४ व्या स्थानावरून ६० व्या स्थानावर पोहोचले आहे. या निर्देशांकाच्या तळाशी अफगाणिस्तान आहे. व्यवसाय, नोकरी किंवा सुट्टीसाठी परदेशात जायचे असल्यास भारतीय नागरिकांना अनेकदा कठोर प्रक्रियेतून जावे लागते. त्यामुळे अनेक भारतीय नागरिक अधिक सहजतेने प्रवास करण्यासाठी इतर देशांचे नागरिकत्व मिळवण्याचा प्रयत्न करतात. जागतिक स्तरावर प्रवास स्वातंत्र्याच्या बाबतीत अजूनही भारताला बराच पल्ला गाठायचा आहे. परंतु झालेली ही वाढ सकारात्मक दिशेने एक पाऊल आहे.

आयुष्य बदलणारे शास्त्रज्ञ

# इसिडोर आयझॅक रबी

कोठेही युद्ध सुरू झाले की, रडार हा शब्द हमखास ऐकू येतो. त्याचबरोबर तुम्हाला मायक्रोवेव्ह ओव्हन माहित असेल. युद्धात शत्रूची विमाने व जहाजांचा ठावठिकाणा सांगणारे रडार आणि त्यासोबतच स्वयंपाक घरात वापरले जाणारे मायक्रोवेव्ह ओव्हन, यापैकी एका साधनामुळे जगभरातील देश सुरक्षित झाले तर दुसऱ्यामुळे स्वयंपाक करणे सोपे झाले. ही साधने कॅव्हिटी मॅग्नेट्रॉनवर आधारित आहेत. त्याचे संशोधन इसिडोर आयझॅक रबी यांनी केले होते. या संशोधनासाठी त्यांना १९४४ मध्ये अणु केंद्रकांच्या चुंबकीय गुणधर्मांची नोंद करण्याच्या त्यांच्या पद्धतीकरिता भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले. जगणे सुसह्य व देश सुरक्षित करणाऱ्या या महान शास्त्रज्ञाचा जन्म २९ जुलै १८९८ रोजी तर मृत्यू ११ जानेवारी १९८८ रोजी झाला. त्यांचा जन्म गॅलिसियातील रायमनोव्ह येथे एका पारंपरिक पोलिश-ज्यू कुटुंबात झाला. बालपणीच ते अमेरिकेत आले आणि न्यू यॉर्कच्या लोअर ईस्ट साइड येथे त्यांचे संगोपन झाले. सुरुवातीला १९१६ मध्ये त्यांनी कॉर्नेल विद्यापीठात इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचा विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला, परंतु लवकरच त्यांचे लक्ष रसायनशास्त्राकडे वळले. त्यानंतर त्यांना भौतिकशास्त्रात रस निर्माण झाला. कोलंबिया विद्यापीठात त्यांनी पुढील शिक्षण घेतले, जिथे त्यांना



विशिष्ट क्रिस्टल्सच्या चुंबकीय संवेदनशीलतेवरील प्रबंधासाठी डॉक्टरेट मिळाली. १९२७ मध्ये त्यांनी युरोपचा दौरा केला आणि त्या काळातील अनेक सर्वोत्तम भौतिकशास्त्रज्ञांना भेटून त्यांच्यासोबत काम केले. त्यांनी स्टर्न-गेर्लाच प्रयोगात बदल करून अणु केंद्रकाचे गुणधर्म निश्चित केले जाऊ शकतात, असे भाकीत केले. अणूंचे चुंबकीय क्षण आणि अणु फिरकी समजून घेण्यासाठी अणु चुंबकीय अनुनाद वापरण्याच्या त्यांच्या तंत्रांसाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले. हे तंत्र अणु भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रासाठी एक महत्त्वाचे साधन बनले. नंतरच्या काळात ते चुंबकीय अनुनाद इमेजिंगच्या (एमआरआय) विकासामुळे ते वैद्यकीय शास्त्रातही महत्त्वाचे ठरले. ते दुसऱ्या महायुद्धानंतर १९५२ ते १९५६ पर्यंत अणुऊर्जा आयोगाच्या जनरल ॲडव्हायझरी कमिटीचे अध्यक्ष होते.

# मोबाईलच्या व्यसनावर मात करण्यासाठी डिजिटल डिटॉक्स

आजकाल, आपला मोबाईल फोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. पण या सततच्या वापरामुळे अनेकदा आपण महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. अशा वेळी, डिजिटल डिटॉक्सची संकल्पना आपल्या मदतीला येते. डिजिटल डिटॉक्स म्हणजे काही काळासाठी मोबाईल फोन आणि इतर डिजिटल उपकरणांपासून दूर राहणे, जेणेकरून आपण स्वतःसाठी आणि आपल्या जवळच्या लोकांसाठी वेळ काढू शकू. याचा उद्देश आपल्या जीवनात ज्या गोष्टी एकेकाळी महत्त्वाच्या होत्या, त्यांचे महत्त्व पुन्हा समजून घेणे हा आहे. जसं की पुस्तक वाचणे, आपली आवडती कला जोपासणे किंवा कुटुंबाशी बोलणे. स्मार्टफोनवर आपण इतके अवलंबून आहोत की, त्यांच्यापासून दूर राहण्यासाठी ॲप्सची गरज भासू लागली आहे. डिजिटल डिटॉक्स ॲप्स आयफोन आणि अँड्रॉइडवर उपलब्ध आहेत. आपल्याला स्क्रीन टाइम कमी करण्यास आणि डिजिटल उपकरणांवरील अवलंबित्व कमी करण्यास ते मदत करतात. ही ॲप्स फोन स्क्रीनपासून दूर ठेवून वास्तविक जीवनाशी पुन्हा जोडण्याचा प्रयत्न करतात.

तुमच्या फोनशी असलेली तुमची मैत्री कमी करा जेणेकरून तुम्ही स्वतःशी, इतरांशी आणि जगाशी पुन्हा



कनेक्ट होऊ शकाल, असे डिजिटल ॲप्सचे वर्णन मानसोपचार तज्ज्ञांनी केले आहे. जर तुम्हाला सतत फोन वापरण्याची सवय असेल किंवा नेटवर्क नसताना अस्वस्थ वाटत असेल, तर डिजिटल डिटॉक्सची वेळ आली आहे. ही ॲप्स एका निश्चित वेळेसाठी (१० मिनिटांपासून ते काही महिन्यांपर्यंत) फोन बंद करतात. या काळात, सोशल मीडिया ॲप्स बंद राहतात आणि फक्त आपत्कालीन कॉलची सुविधा उपलब्ध असते. काही ॲप्समध्ये कॉलवर वेळ मर्यादा देखील सेट करता येते. मात्र, डिजिटल डिटॉक्स ॲप निवडताना योग्य काळजी घेणे महत्त्वाचे आहे. हे ॲप्स प्रभावी असल्याचा अनेकांना अनुभव आहे. ॲप वापरून फोन डिटॉक्स मोडवर ठेवल्यानंतर सवयीनुसार फोन उचलला तर स्क्रीनवर विविध संदेश येतात. तुम्ही फिरायला जाऊ शकता स्वयंपाक करू शकता, कुटुंबासोबत चहा प्या किंवा बागकाम करा, अशा सूचना दिल्या जातात. त्यामुळे फोन पासून दूर राहता येते. थोडक्यात हे ॲप्स फोनचा वापर केवळ अत्यंत महत्त्वाच्या कामांपुरता मर्यादित ठेवतात.

द हिंदू या वृत्तपत्रात प्रकाशित एका वृत्तानुसार भारतातील ८६ टक्के प्रौढांकडे स्मार्टफोन आहेत आणि त्यापैकी ३० टक्के लोक दररोज सुमारे सहा तास स्क्रीनवर घालवतात. रेडसीअर स्ट्रॅटेजीच्या २०२४ च्या अहवालानुसार, भारतात सरासरी स्क्रीन टाइम साडेसात तास आहे. तज्ज्ञांच्या मते, हा जास्त स्क्रीन टाइम शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी धोकादायक आहे. कुटुंबासह घरात असतानाही आपण स्वतःला वेगळे केले आहे. मानवी स्वभाव एकटे राहण्याचा नाही, तर समाजप्रिय आहे. पण अनावश्यक स्क्रीन टाइममुळे लोक एकलकोंडे होत आहेत. प्रियजनांशी बोलण्याऐवजी फोनवर वेळ घालवण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. या एकटेपणामुळे मेंदूशी संबंधित अनेक आजार होऊ शकतात. आपले दुःख कोणाशी वाटून घेत नाही, तर मदतीसाठी एआयवर अवलंबून राहत आहोत. तेव्हा मानसिक आजारात होऊ शकतो. मानवी विकास हा परस्पर संभाषण, अनुभव आणि कल्पनांची देवाणघेवाणशी संबंधित आहे. हेच आता कमी झाले आहे. निरोगी मन आणि निरोगी शरीर अत्यंत महत्त्वाचे आहे. रोगट मानवी मेंदू निरोगी माणसाला आजारी पाडू शकतो. जर एकटेपणा दीर्घकाळ टिकला तर मानसिक आजारांसोबत शारीरिक आजारही बळावतील, असा मानसोपचार तज्ज्ञ देत आहेत. त्यामुले डिजिटल डिटॉक्सही आता गरज झाली आहे.

**(दैनिक सत्यप्रभा डेस्क)**



## लेखकांना आवाहन

दैनिक सत्यप्रभासाठी विविध व प्रासंगिक विषयांवर लेख लिहून पाठवावेत. योग्य त्या लेखांना प्रसिद्धी देण्यात येईल. लेखकांनी आपला लेख युनिकोडमध्ये टाईप करून dainiksatyaprabha2015@gmail.com या मेलवर पाठवावेत.

**कार्यकारी संपादक**

सत्यप्रभा
हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२
**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**
**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**
या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
https://epaper.esatyaprabha.com
र.क्रं. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### कारगिल उद्यानात रणगाड्याचे अनावरण

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील कारगिल स्मृती उद्यानात बसविण्यात आलेल्या टी ५५ रणगाड्याचे लोकार्पण करण्यात आले. ऑपरेशन सिंदुर संकल्पनेवर आधारित आणखी एक उद्यान शहरात उभारले जाईल, असे इतर मागासवर्गीय कल्याण मंत्री अतुल सावे यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास मंत्री अतुल सावे, मनपा प्रशासक जी. श्रीकांत, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर सय्यदा फिरासत, माजी उपमहापौर राजेंद्र जंजाळ, पंकज भारसाखळे आदींची उपस्थिती होती.

### संभाजीनगरमध्ये भर पावसात धरणे

**तुळजापूर :** जिल्हा परिषद शिक्षकांच्या सार्वत्रिक बदल्यांमधील अनियमितता आणि संचमान्यतेविरोधात शिक्षकांच्यावतीने शनिवारी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर भर पावसात तीन तास धरणे आंदोलन करण्यात आले. शिक्षक कृती समितीच्यावतीने या आंदोलनाची हाक देण्यात आली होती. यावेळी कृती समितीने एक निवेदनही दिले. या आंदोलनात कृती समितीचे दिलीप ढाकणे, राजेश भुसारी, आदी उपस्थित होते.

### शिवनाटाकळी प्रकल्प, साठ टक्के भरला

**छत्रपती संभाजीनगर':** कन्नड तालुक्यातील हतनूर परिसरातील शिवना टाकळी प्रकल्प ६०.५३ टक्के भरला आहे. जुलै महिन्यात संततधार झालेल्या पावसाने तालुक्यातील धरणे भरली आहेत. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांची पाण्याची चिंता मिटली आहे. शिवना टाकळी प्रकल्पाची ५६१.८० द.घ.मी इतका पाणी साठ्याची क्षमता आहे. या प्रकल्पांमध्ये आतापर्यंत ५५१.८० (द.ल.घ.मी.) इतका पाणीसाठा झाला आहे.

### पूर्णा तालुक्यात खरिपाला जीवदान

**परभणी:** जून महिन्यानंतर जवळपास महिनाभर पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांची वाढ थांबली होती. मात्र, शुक्रवारी रात्रीपासून सुरू झालेल्या जोरदार पावसामुळे सोयाबीन, मूग, उडीद, तूर, कापूस, ज्वारी या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. जुलै महिन्यात २२३.८ मिमी सरासरी आवश्यक असताना २५ जुलैपर्यंत २४०.४ मिमी पाऊस झाला आहे. यंदा जुलैमध्ये गतवर्षीच्या तुलनेत काही प्रमाणात कमी पाऊस झाला. तुट भरून निघण्याची शक्यता आहे.

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**छत्रपती संभाजीनगर:** कारने पाठीमागून दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास जालना रोडवरील सेवनहिल उड्डाणपुलाजवळ घडली. पोलिस निरीक्षक अशोक भंडारे यांनी ही माहिती दिली. मृत झालेल्या तरुणाची रात्री उशिरापर्यंत पुंडलिकनगर पोलिसांकडून ओळख पटवण्यात येत होती. दुचाकीस्वार (एमएच २० एफ वाय ३९६३) सिडकोकडून सेवनहिलकडे जात होता.

### वाशी तालुक्यात सोयाबीनला दिलासा

**धाराशिव:** वाशी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून रिमझिम सरीसह जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. २१ जुलैपासून सुरू झालेल्या या पावसाचा जोर शनिवारीपर्यंत कायम होता. या पावसामुळे सुकत चाललेल्या सोयाबिन पिकाला जीवदान मिळाले. तालुक्यात ३८ हजार १३४ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी करण्यात आली आहे.

### ट्रिगर रद्द केल्याने विमा मिळण्याबद्दल शेतकऱ्यांना शंका

# पीकविम्यात सहभाग घटला


प्रतिनिधी । नांदेड

यावर्षीच्या खरीप हंगामासाठी लागू करण्यात आलेल्या पीकविमा योजनेतील नवीन बदल आणि नियमांमुळे शेतकऱ्यांमध्ये अनिश्चितता निर्माण झाली आहे. केवळ पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई मिळणार असल्याने आणि इतर महत्त्वाचे ट्रिगर रद्द केल्याने विमा मिळेल की नाही याबाबत शेतकऱ्यांच्या मनात शंका आहेत.

गेल्या दोन वर्षांपासून शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसान भरपाई न मिळाल्याने नाराजी होती. त्यातच आता शासनाने मागील हंगामात लागू केलेली एक रुपयात पीक विमा योजना पूर्णपणे बंद केली आहे. या सर्व बदलांमुळे आणि गेल्या वर्षांच्या अनुभवामुळे शेतकऱ्यांमध्ये विमा भरण्याबाबत उदासीनता दिसुन येत आहे. गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती, परंतु यावर्षी ही संख्या निम्म्यानेही कमी झाली आहे. अंतिम तारीख जवळ येत असतानाही शेतकऱ्यांची नकारात्मकता लक्षात घेता ही संख्या वाढेल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे असे सीएससी केंद्र चालक सांगत आहेत.

#### या नियमावलीमुळे पीकविमा उतरवण्यास शेतकरी उदासीन

- खरीप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के हप्ता. रब्बी हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या १.५ टक्के हप्ता
- नगदी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के हप्ता. जेवढे पेरले तेवढीच नोंद पीक विम्याच्या अर्जात करावी लागणार
- या नवीन ऐच्छिक योजनेत सहभागासाठी ई-पीक पाहणीअंतर्गत पिकांची नोंद आणि ॲग्रिस्टॅक फार्मर आयडी बंधनकारक
- २४ जून २०२५ च्या शासन निर्णयानुसार चुकीची माहिती देणाऱ्या शेतकऱ्याला पाच वर्षांसाठी ब्लॅक लिस्ट केले जाण्याचा धोका आहे.



#### रद्द झालेले ट्रिगर आणि ब्लॅक लिस्टचा धोका

यापूर्वीच्या एक रुपयात पीक विमा योजनेत चार ट्रिगरच्या आधारे भरपाई दिली जात होती. मात्र, नव्या बदलानुसार, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती आणि काढणी पश्चात नुकसान भरपाई हे तीन महत्त्वाचे ट्रिगर रद्द करण्यात आले आहेत. आता फक्त हंगामाच्या शेवटी, पीक कापणी प्रयोग, तांत्रिक उत्पादन आकडेवारीवर आधारित नुकसान भरपाई दिली जाणार आहे. हे नियम जाचक ठरत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

### अल्पसंख्याक वसतिगृह दहा वर्षांपासून बंद

प्रतिनिधी। हिंगोली

कळमनुरी येथील अल्पसंख्याक वसतिगृह २०१५ पासून बंद आहे. याविरुद्ध नागरिकांनी कुलूप फोडो आंदोलन करत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसह त्वरित वसतिगृह सुरू करण्याची मागणी केली. या आंदोलनात अल्पसंख्याक समाजाचे विद्यार्थी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिक सहभागी झाले होते.

ग्रामीण भागातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून शहरात शिक्षणासाठी सोयीसुविधेसाठी अल्पसंख्याक वसतिगृहाची अद्यावत इमारत असताना मागील दहा वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. बंद अवस्थेमुळे सुमारे २००० विद्यार्थी वसतिगृहाच्या सुविधांपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर नकारात्मक परिणाम होत असल्याने शहरातील अनेक जागरूक नागरिकांनी या बाबीकडे लक्ष घालत वसतिगृह सुरू करण्याची मागणी केली आहे.

## तरुणीने संपवले जीवन ; स्नॅप चॅटवर सापडले कारण

प्रतिनिधी। छत्रपती संभाजीनगर

भावसिंगपुऱ्यातील प्रारंभी इंगळे (वय १८, रा. भीमनगर, भावसिंगपुरा) हिने १९ जुलैला गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तिचा मित्र सचिन राजु भिसे (वय १९, रा. मिलकॉर्नर) याच्याविरोधात छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सचिन ब्लॅकमेल करून मानसिक त्रास देत होता व त्रासाला कंटाळूनच तिने आत्महत्या केल्याचे पालकांनी केलेल्या तक्रारीत नमूद केले आहे.

या प्रकरणी मृत मुलीची आई सुजाता इंगळे ( वय ३९, रा. भीमनगर, भावसिंगपुरा) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार, प्रारंभी ही समर्थनगर येथील खासगी रुग्णालयात ऑपरेशन टेक्निशियन प्रशिक्षक म्हणून कार्यरत होती. रुग्णालयात काम करीत असताना तिची ओळख सचिन याच्याशी झाली होती. त्यानंतर दोघे प्रेमात पडले. प्रारंभीच्या घरच्यांनी सुरुवातीला लग्नासाठी संमती दिली होती. मात्र, सचिनला नोकरी नसल्याने प्रारंभीचे वडील दीपक यांनी लग्नाचा प्रस्ताव नाकारला. त्यानंतरही प्रारंभी आणि सचिन यांच्यात संपर्क सुरूच होता. सचिन याने वेळोवेळी प्रारंभी आणि तिच्या आईकडून एकदा गाडी खरेदीसाठी २० हजार रुपये मागितले, त्याला तीन हजार रुपये रोख दिल्याचेही त्यांच्या तक्रारीत नमूद आहे.

#### तरुणीच्या मित्राला पोलिसांकडून अटक

फिर्यादीच्या वहिनीने प्रारंभीचा मोबाइल पाहिला असता, स्नॅपचॅट ॲपमध्ये सचिनचे अनेक मिस कॉल्स, तसेच तिचे त्याला पाठवलेले मेसेज आढळले. त्यातून सचिनवर ब्लॅकमेलिंगचा आरोप करण्यात आला आहे.

## पीडब्ल्यूडीत ३१ जणांच्या बनावट नियुक्त्या

### कार्यकारी अभियंत्यांच्या बनावट सह्यांचा वापर; दोघे बडतर्फ

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

कार्यकारी अभियंत्यांच्या बनावट सह्या करून गेल्या दहा वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागात शिपाई, चौकीदार आणि सफाई कामगार पदावर बोगस नियुक्ती केल्याचे प्रकरण उघड झाले आहे. दोन लिपिकांनी ३१ जणांना शासकीय सेवेत नियुक्त झाल्याचे पत्र दिल्याचे समोर आले आहे. बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपिक अंकुश श्रीरंग हिवाळे (रा. सौजन्यनगर, काल्डा कॉर्नर) व कनिष्ठ लिपीक उज्ज्वला अनिल नरवडे (रा. सार्वजनिक बांधकाम विभाग क्वार्टर, गोपाल टी), अशी त्यांची नावे आहे. हे दोघेही सध्या बडतर्फ आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शेषराव काशीनाथ चव्हाण यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, २०१५ ते २०२५ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जालना व लातूर येथील सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग विभागांतर्गत ३१ जणांना शिपाई, चौकीदार व सफाई कामगार अशा पदांवर नियुक्त करण्यात आले. या नियुक्त्यांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली नव्हती. तरीही संबंधित लिपिकांनी कार्यकारी अभियंत्यांच्या स्कॅन केलेल्या किंवा मॉर्फिंगद्वारे तयार केलेल्या बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर केला. खोट्या नियुक्तीपत्रांद्वारे उमेदवारांना शासकीय सेवा मिळवून दिली.

या प्रकरणात १५ मे २०२५ रोजी तत्कालीन कार्यकारी अभियंता अशोक येरेकर यांच्या आदेशाने एस. बी. बिहारे यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली. या चौकशी दरम्यान बनावट नियुक्ती पत्रांवर स्वाक्षऱ्या केल्या गेल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात बनावट नियुक्तीपत्र देणाऱ्या अंकुश हिवाळे व कनिष्ठ लिपिक उज्ज्वला नरवडे या दोंघाच्या विरोधात वेदांतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### लाडे-पागे नियमानुसार १६ उमेदवार नियुक्त

बनावट कागदपत्रांचा वापर करून १२ उमेदवारांना अनुकंपा, १६ उमेदवारांना लाड पागे शिफारशीनुसार आणि तीन उमेदवारांना सरळ सेवेद्वारे सेवेत घेतले आहे. ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. त्या उमेदवारांचे पालक शासकीय सेवेत नव्हते, अशी माहिती समोर आली आहे.

### श्री तुळजाभवानी मंदिरात लाडू प्रसाद सेवा



**तुळजापूर :** श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानतर्फे भाविकांसाठी लाडू प्रसाद सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेमुळे देवदर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना भक्तिभावाने परिपूर्ण व सुलभ प्रसाद सेवा उपलब्ध होणार आहे. या सेवेचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले. लाडू प्रसादाच्या विक्रीसाठी मंदिर परिसरात तीन वेगवेगळे काउंटर सुरू करण्यात आले आहेत. प्रत्येक लाडू पाकिटाचे वजन ५० ग्रॅम असून, त्याची किंमत ३० रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे. प्रसाद सेवेच्या शुभारंभानंतर चितळे परिवाराकडून भाविकांना एक हजार लाडूचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश भाविकांना दर्जेदार, स्वच्छ व श्रद्धाभाव निर्माण करणारी प्रसाद सेवा पुरवणे हा असून, यामुळे मंदिरातील सेवाभाव अधिक सशक्त होणार आहे.

### मुक्या जनावरांवर ॲसिडचा हल्ला

प्रतिनिधी। छत्रपती संभाजीनगर

गंगापूर तालुक्यातील अमळनेर येथे अज्ञात व्यक्तीने दोन मुक्या गुरांवर ॲसिड फेकल्याने ती गंभीररीत्या भाजली आहेत. या अमानुष कृत्यामुळे संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली असून, दोषीला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ॲसिड हल्ल्यामुळे जनावरांची त्वचा अक्षरशः सोलून निघाली आहे.

अमळनेर, लखमापूर, कायगाव आणि गणेशवाडी या परिसरात देवाला वाहिलेली अनेक गुरे (वनगुरे) फिरत असतात. गावातील चराई क्षेत्र कमी झाल्याने जनावरे शेतात घुसून पिकांचे नुकसान करतात. या रागातून कोणीतरी हे कृत्य केले असावे, असा अंदाज आहे. गंगापूर पोलिसांनी या घटनेची दखल घेतली आहे.

## त्या गर्भपातप्रकरणी चौकशी ; पीसीएनडीटी पथक येणार

प्रतिनिधी। परभणी

शहरातील एका खाजगी रुग्णालयाच्या शौचालयात सापडलेल्या ५ महिन्यांच्या मृत अर्भक प्रकरणाची चौकशी आरोग्य विभागाकडून सुरू झाली. सहायक संचालक डॉ. दयानंद मोतीपवळे यांनी ' येथील ग्रामीण रुग्णालयास भेट देऊन पाहणी करत माहिती घेतली. या प्रकरणात राज्याचे पीसीपीएनडीटीचे पथक येऊन सर्व ठिकाणांची तपासणी करून माहिती घेत कारवाई करतील, असे सांगण्यात आले आहे.

येथील एका खासगी रुग्णालयात पाच महिन्याचा गर्भ असलेली ३२ वर्षीय माता ही २० जुलैला सकाळी १० वाजता पोट दुखत असल्याने उपचारासाठी आली. त्या अवस्थेत ती शौचालयात गेली व तेथे गर्भपात होऊन अर्भक शौचालयात पडले. नंतर सदर महिला खासगी रुग्णलायातून निघून गेली. याच दिवशी त्या महिलेचा हॉस्पिटलमधील सीसीटीव्ही फुटेज तपासून शोध घेतल्यानंतर हे अर्भक आपलेच असल्याचे तिने सांगितले. याप्रकरणी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली. यानंतर पोलिसांनी प्रकरणातील महिला व अर्भकास ताब्यात घेत ग्रामीण रुग्णालयात गेले. अर्भक व मातेची तपासणी करून अहवाल मागविला असता रुग्णलयाने अर्भकास परभणी येथील शासकीय रुग्णालयात पाठविले व तेथे अर्भकाची तपासणी करून शवविच्छेदन केले.

#### उपसंचालकांची बैठक

उपसंचालक डॉ. कांचन वानरे व सहाय्यक उपसंचालक डॉ. मोतीपवळे हे परभणी दौऱ्यावर आले होते. यातील उपसंचालक डॉ. वानरे यांनी परभणीच्या सर्व आरोग्य संस्थांच्या प्रमुखांची बैठक परभणीत घेतली. सर्व पाहणीनंतर या प्रकरणात राज्याचे पीसीपीएनडीटीचे पथक येऊन सर्व ठिकाणांची तपासणी करून माहिती घेत कारवाई करतील, असे सांगण्यात आले.

### दागिने उजळून देण्याच्या बहाण्याने वृद्धेची फसवणूक

प्रतिनिधी । हिंगोली

सेनगाव तालुक्यातील कडोळी येथे एका वृद्ध महिलेची दागिने उजळून देण्याच्या बहाण्याने फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी त्या महिलेने गोरेगाव पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

सेनगाव तालुक्यातील कडोळी येथे दोन भामटे शुक्रवारी दुपारी गावात आले होते. त्या भामट्यांनी गावातील एक ज्येष्ठ महिला वच्छलाबाई कांबळे यांच्या घरी जाऊन दागिने उजळून देत असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांनी त्यांना चांदीचे कडे व कोपरे उजळून देण्यासाठी दिले. त्यानंतर भामट्यांनी चांदीचे दागिने उजळून दाखविले आणि काही वेळानंतर ते पसार झाले. या दागिन्यांचे वजन कमी भरत असल्याचे महिलेच्या लक्षात आले. त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती घरी आल्यानंतर त्यांना हा प्रकार सांगितला. त्यावरून त्यांनी दागिन्यांचे वजन केले असता ते दागिने पाचशे ग्राम वजनाचे असतांना उजळल्यानंतर त्याचे वजन अडीचशे ग्रामच भरले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

### संभाजीनगरमधील नागरिकांनी मनपाला ठणकावले, ९०० घरे होणार बाधित

# आधी घर द्या ; मगच आमची घरे पाडा

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

आधी घर द्या मगच पाडापाडी करा, अशी मागणी बायजीपुरा, रेंगटीपुरा, मोंढा, दादा कॉलनी, भवानीनगरातील नागरिकांनी नुकत्याच झालेल्या एका बैठकीत केली. चंपा चौक ते जालना रोडच्या रस्ता रुंदीकरणात या भागातील ९०० मालमत्ता बाधित होत असल्याने हवालदिल झालेल्या नागरिकांनी संताप व्यक्त केला. त्यांनी यावेळी मनपा प्रशासन आणि प्रशासक जी. श्रीकांत यांच्याविरोधात घोषणाबाजी केली.

शहरातील रस्ते रुंदीकरणासाठी महापालिकेकडून अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्यात येत आहे. त्याअंतर्गत आत्तापर्यंत मुकुंदवाडी, संजयनगर, चिकलठाणा, बीड बायपास, कांचनवाडी, नक्षत्रवाडी, पडेगाव येथील मालमत्तां मनपाने पाडल्या. दरम्यान चंपा चौक ते जालना रोडच्या रस्ता रुंदीकरणाची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. हा रस्ता ३० मीटरचा असून, विद्यमान विकास आराखड्यात १८ मीटरचा दाखविण्यात आला आहे. मनपाकडून यापूर्वीच चंपा चौक ते जालना रोड हा शंभर फूट करण्यासाठी अनेक मालमत्ताधारकांना टीडीआर देण्यात आलेला आहे. या रस्त्यामध्ये संजयनगर, रेंगटीपुरा, जुनामोंढा, दादा कॉलनी, भवानीनगर या भागातील सुमारे ९०० पेक्षा अधिक मालमत्ता बाधित होत आहेत. रस्त्यामध्ये घरे जाणार असल्यामुळे या भागातील नागरिक हवालदिल झाले आहेत.

या भागातील नागरिकांनी एकत्र येत बाथ्रीतेली मंगल कार्यालयात बैठक घेतली. आम्ही ६० ते ७० वर्षांपासून या भागातील रहिवासी आहोत. आम्ही घाम गाळून मोठ्या कष्टाने घरे बांधली आहेत. अनेकांनी आपल्या आयुष्याची कमाई गुंतवून या घरांचा पाया रचला आहे. आता कोणतीही पुनर्वसनाची तरतूद न करता अचानक आमच्या घरांवर बुलडोझर चालवले जाणार आहे. यामुळे सामान्य, गरीब, कष्टकरी वर्गाच्या घरांवर अन्याय होणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. महापालिका याचा विचार करते याकडे लक्ष राहिल.

#### आधी आयुक्तांचा अतिक्रमित बंगला पाडा

महापालिका आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयाचाही काही भाग रस्ता रुंदीकरणात बाधित ठरत आहे. त्यामुळे आधी ते पाडा, नसता आम्ही त्यांच्या दारात जाऊन बसतो, अशी मागणी नागरिकांनी यावेळी केली.



#### पालिकेवर पर्यायाकडे दुर्लक्षाचा आरोप

पर्यायी मार्ग म्हणून हॉटेल अजमेरी कडूनही हा रस्ता केला जाऊ शकतो. मात्र मनपा तसे न करता आमची घरे पाडत आहे, असा आरोपही नागरिकांनी केला. यावेळी नागरिकांनी राजकीय नेत्यांचाही निषेध केला. निवडणुकीच्या वेळी उंबरे झिजवणारे, आता गायब झाले आहेत. आम्ही संकटात असताना कोणीही आमच्या पाठीशी उभे नाही, अशी भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केली.

**अनागोंदी** कंत्राटदाराने तोडले नळ, छत्रपती संभाजीनगरची पालिका दाद देईना

# नळ कनेक्शनसाठी वृद्ध महिलेची पीएमओकडे तक्रार

प्रतिनिधी। छत्रपती संभाजीनगर

आठ ते दहा दिवसांआड होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे त्रस्त नागरिकांसमोर आणखी एक संकट उभे राहिले आहे. रस्त्यासाठी केलेल्या खोदकामामुळे महापालिका नियुक्त कंत्राटदाराने अधिकृत नळ कनेक्शन तोडले आहेत. हे कनेक्शन जोडून देण्याकडे महापालिकेने सतत दुर्लक्ष केले. त्यामुळे त्रस्त झालेल्या एका वृद्ध महिलेने पंतप्रधान कार्यालयाकडे ईमेलद्वारे तक्रार दाखल केली आहे.


केंद्र आणि राज्य सरकारने महापालिकेला २७४० कोटींची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर केली आहे. सध्या शहरवासीयांना ८ ते १० दिवसांआडच पाणी मिळत आहे. परंतु, असे असतानाही टिळकनगर येथील एक कुटुंब तब्बल ८ ते ९ महिन्यांपासून पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे. महापालिकेच्या एनओसीनंतर लोकप्रतिनिधीच्या निधीतून टिळकनगर भागात गेल्या वर्षी रस्त्याचे काम करण्यात आले.

या कामासाठी रस्त्याचे खोदकाम करण्यात आले. या खोदकामावेळी या परिसराला पाणीपुरवठा करणारी अंतर्गत लहान क्षमतेची जलवाहिनी फुटली. त्यानंतर ती जलवाहिनी जोडून देण्याऐवजी कंत्राटदाराने ती काढून नेली. त्यावर अनेकांच्या नळ जोडण्यात होत्या. परंतु, मुख्य वितरण पाईपच काढून नेल्याने येथील नागरिकांपुढे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पाईपसाठी रहिवासी नागरिकांनीच पैसे जमा करावे, असा सल्ला दिला. त्यावर परिसरातील रहिवासी मंगला माणिकराव कुलकर्णी यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांचे नळ कनेक्शन जोडून देण्यात आले नाही.

#### दहा महिन्यांपासून प्रतीक्षा

महापालिका वारंवार काम झाले म्हणून आमची तक्रार निकाली काढत आहे. मात्र, मागील दहा महिन्यांपासून एकदाही महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नळ कनेक्शन जोडून दिलेले नाही. यात शहर अभियंता ए.बी. देशमुख यांनी तर सपशेल दुर्लक्षच केले, असेही आनंद कुलकर्णी यांनी सांगितले.



#### शासन आदेशाकडेही दुर्लक्ष

याबाबत राज्य शासनाने महापालिकेला नळ कनेक्शन तातडीने जोडून देण्याचे आदेश दिले आहेत. परंतु, त्यानंतरही महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी अद्यापही नळ जोडून दिलेले नसल्याचे कुलकर्णी कुटुंबाकडून सांगण्यात येत आहे.

## आजोबांच्या मृत्यूचे दु:ख ; नातीनेही सोडला जीव

प्रतिनिधी। छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर येथून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. वृद्धापकाळाने मृत्यू झालेल्या आजोबांचा अंत्यविधी सुरू असताना दुःख सहन न झाल्याने चार महिन्यांपूर्वी विवाह झालेल्या नवविवाहितेनेही जीव सोडला. ही घटना नुकतीच घडली.

ज्येष्ठ नागरिक नरसिंग हनुवंता गायकवाड असे निधन झालेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. तर पुनम (उर्फ छकुली) विक्रम तुपे (वय १९) असे मयत नवविवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, आळंदी येथे राहणारे नरसिंग गायकवाड यांचं वृद्धापकाळाने निधन झाले. या घटनेमुळे सर्व नातेवाईक आळंदी येथे आले. आजोबांचे निधन झाल्यामुळे नवविवाहित पूनम देखील आली. याचवेळी पूनमच्या छातीत त्रास होऊ लागला. यामुळे पूनमला तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र पूनमच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. दरम्यान उपचार सुरू असताना शुक्रवारी सकाळी पूनमने प्राण सोडले. अगोदरच कुटुंबात घरातील जेष्ठ नागरिक गेले. त्या पाठोपाठ नवविवाहितेचा मृत्यू झाल्याने गायकवाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### गुरुद्वारा बोर्डाच्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ

**नांदेड :** येथिल गुरुद्वारा सचखंड बोर्डाच्या कर्मचाऱ्यांनी घेतलेले परिश्रम आणि केलेले सुनियोजित कार्य लक्षात घेऊन प्रशासक डॉ.स.विजय सतबीर सिंघजी यांनी बोर्डाच्या कायम कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतन वृध्दी लागू केली आहे.त्या बद्दल बोर्डचे अधिकारी, विभाग प्रमुख, इंचार्ज व सर्व कर्मचाऱ्यांच्यावतीने प्रशासक डॉ.स.विजय सतबीर सिंघ यांचे आभार मानले आहेत.

### श्रावणी सोमवारनिमित्त महाप्रसादाचे वाटप

**भोकर :** श्रावणातील पहील्या सोमवारी गुड्डा महादेव येथे दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी येथील अशोक चिंतावार यांनी महाप्रसादाचे वाटप केले. शहरालगतच्या वन पर्यटन केंद्र नारवट येथे असलेल्या गुड्डा महादेव मंदिरात सकाळ पासूनच भक्तांची गर्दी दर्शनासाठी होत होती. दर्शनासाठी आलेल्या भक्तगणांसाठी व्यापारी अशोक चिंतावार यांनी महाप्रसादाचे वाटप केले.

### कुरेशी समाजाचा तहसीलवर मोर्चा

**हदगाव :** महाराष्ट्र कुरेशी कॉन्फरन्स च्यावतीने तहसील कार्यालय येथे सोमवार २८ जुलै रोजी कुरेशी समाजाचे संविधानिक हक्क व अधिकार या बाबत कुरेशी कॉन्फरन्स सोशल ऑर्गनायझेशनचे तालुका अध्यक्ष जावेद कुरेशी यांच्या नेतृत्वात तहसीलदार यांच्या मार्फत शासनास मोर्चाद्वारे निवेदन दिले आहे. यावेळी कुरेशी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सिडकोत घरफोडी ६० हजारांचे दागिने लंपास

**नांदेड :** सिडको परिसरातील महावीर चौकात शिवकांत उमाकांत भूसाटे यांच्या घरी ते मध्यरात्रीला घरात झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करुन व किचनमधील लोखंडी आलमारीचे लॉकर तोडून ६० हजार किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले. या प्रकरणी शिवकांत भुसाटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.घरफोडीची ही घटना २६ जुलैच्या रात्री घडली.तपास पोहेकॉ जुनकुट करीत आहेत.

### अंदर-बाहर जुगार खेळताना पकडले

**नांदेड:** हदगाव तालुक्यातील कौठा येथे अंदर-बाहर नावाचा जुगार खेळताना पोलिसांनी छापा मारुन कारवाई केली. आरोपी विनोद उर्फ बालाजी जाधव व इतर पाचजण विनापरवाना बेकायदेशिररित्या अंदर-बाहर नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना आढळून आले. हदगाव पोलिसांनी कौठा ता.हदगाव येथे छापा मारुन रोख ३हजार ३०० रुपये, तीन मोबाईल व जुगार साहित्य जप्त केले. या प्रकरणी पोउपनि राजेश मारोती नंद यांच्या फिर्यादीवरुन हदगाव पोलीस ठाण्यात ६ आरोपी विरोधात जुगार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### खंजर बाळगणारा मुलगा ताब्यात

**नांदेड :** इतवारा पोलीस ठाण्याअंतर्गत विनापरवाना बेकायदेशीररित्या एक विधी संघर्ष बालक लोखंडी खंजर घेवून फिरत असताना आढळून आला. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या स्ट्रीट सेफ्टी ड्रायव्हीव अंतर्गत नेमलेल्या पथकाने २७ जुलै रोजी महमद अली रोडवर त्या बालकास ताब्यात घेवून झडती घेतली असता त्याच्याकडे खंजर आढळून आला. या बाबत इतवारा ठाण्याचे पोहेकॉ बंडू केशवराव कलंदर यांनी ठाण्यात फिर्याद नोंदवली असून त्यांच्या फिर्यादीवरुन आरोपी विधी संघर्ष बालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

---

भाजपा जंगमवाडी मंडलाध्यक्ष आशिष नेरलकर यांच्यावतीने दहावी, बारावीतील गुणवंतांचा सत्कार

# स्पर्धात्मक परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे

## खा.अशोकराव चव्हाण यांचे मत

प्रतिनिधी | नांदेड



**विद्यार्थ्यांना शिकवा.. आम्ही पाठीशी आहोत!**

स्पर्धात्मक परीक्षांमध्ये अवघड समजल्या जाणाऱ्या सीए परीक्षेमध्ये नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी देशपातळीवर पहिला क्रमांक मिळविला आहे. याचा सार्थ अभिमान आहे. राजकीय मंडळींनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी ''तुम्ही विद्यार्थ्यांना शिकवा... आम्ही तुमच्या पाठीशी आहोत ''असे म्हणून मदतीसाठी तत्पर असायला हवे. आर्थिक परिस्थिती अभावी होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये यासाठी राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी पुढे आले पाहिजे.

नांदेड जिल्हा गुणवंताची खाण आहे. डॉक्टर व अभियंते होण्याबरोबरच नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षा कडे वळले पाहिजे व त्यामधून आपले करियर घडवावे असे मत राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी जंगमवाडी भाजपा मंडळातर्फे आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थी सत्कार प्रसंगी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला माजी आ.तथा भाजपाचे महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, विभागीय संघटन मंत्री संजय कोडगे, प्रवीण साले, शिवा कांबळे, भार्गव राजे, रमाकांत जोशी, किशोर स्वामी, डॉ सचिन उमरेकर, विजय येवनकर, श्रावण पाटील भिलवंडे, सौ. वैशालीताई देशमुख, शितल खांडील, अमोल कदम मोहनसिंह तौर, राजू यन्नम ,विजय गंभीरे, पुष्पाताई वानखेडे, व्यंकटेश जिंदम, अनिल हजारी, बागडया यादव, संयोजक आशिष नेरलकर यांची यावेळी उपस्थिती होती.

सौरभ कुलकर्णी यांनी स्वागत गीत सादर केले. मान्यवरांच्या हस्ते दीपपज्वलन व भारत मातेचे पूजन करून कार्यक्रम सुरू करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक आशिष नेरलकर यांनी केले.'यावेळी बोलताना खा. अशोकराव चव्हाण पुढे म्हणाले,''मेहनत करणाऱ्यांच्या पाठीवर हात ठेवून चांगले काम करत आहात असे म्हणल्यास त्यांना प्रोत्साहन मिळते. जंगमवाडी भाजपा मंडळातर्फे आयोजित केलेल्या या गुणवंतांच्या सत्कार समारंभाचे संयोजक आशिष नेरलकर यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. यावेळी भाजपाचे महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर म्हणाले, ''गुणवंतांनी आपल्या करिअरचा उपयोग देशसेवेसाठी करावा व देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न करावेत.''

यावेळी शिवा कांबळे यांनीही समयोचित मनोगत व्यक्त केले. प्रवीण साले आपल्या भाषणात म्हणाले,'' आजच्या युवकांनी पारंपारिक शिक्षणाबरोबरच कौशल्य शिक्षण घेणे गरजेचे आहे. निर्माणों के पावन युगमें हम चरित्र निर्माण न भूले या गीतामधील ओळींचा अर्थ युवकांनी समजून घेणे आवश्यक आहे असे ते म्हणाले.

प्रारंभी इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेमधील व नीट जेईई परीक्षेतील दहा गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक डझन वह्या, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच दीडशेहून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांना क्रांतिकारकांचे मुखपृष्ठ असणाऱ्या वह्या, प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धाराशिव शिराळे यांनी केले तर आभार प्रदर्शन अनिल डोईफोडे यांनी केले. कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्र शासनाने खुल्या प्रवर्गासाठी सुरू केलेल्या अमृत या स्वायत्त संस्थेच्या उपक्रमाचा स्टॉल लावण्यात आला होता. अमृत संस्थेचे जिल्हा समन्वयक अनिल डोईफोडे, मनीषा कुंनसावळीकर, ओंकार शेटे, सौरभ कुलकर्णी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सदाशिव कल्याणकर, प्रवीण कुलकर्णी, जयेश कुलकर्णी, अनिल डोईफोडे, अमोल चौधरी, कैलास वडजे, क्षितिज जाधव, आशुतोष धर्माधिकारी, संकेत कोत्तावार, मोहन मामीलवाड, श्रीकांत चिंचलवाड बळीराम लाडेकर तसेच भाजपा जंगमवाडी मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला शहरातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### ■ चहा पाजवून संस्थेमध्ये प्राध्यापकांची भरती

आमच्या शिक्षण संस्थांमधून शिक्षक व प्राध्यापकांची निवड करत असताना आम्ही संस्थेचा चहा निवड झालेल्यांना पाजवतो. कोणत्याही प्रकारची आर्थिक देणगी न घेता कर्मचाऱ्यांची भरती करतो. त्यामुळेच शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्ता निर्माण होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने देशाला चांगले नेतृत्व मिळाले आहे. त्यांच्या विधायक कार्याचा आदर्श युवकांनी घ्यायला हवा.

---

# ७३ हजार प्रवाशांवर कारवाई

## ३ महिन्यांत ४.११ कोटींचा दंड वसूल

प्रतिनिधी | नांदेड

नांदेड रेल्वे विभागाने एप्रिल ते जून या तीन महिन्यांत तिकीट तपासणी मोहिमेअंतर्गत ७३ हजारहून अधिक अनधिकृत प्रवाशांवर कारवाई करत तब्बल ४ कोटी ११ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. ही मोहीम विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात आली.

सिंगणापूर हॉल्ट स्टेशनवर २२ जुलै रोजीॲम्बुश तपासणीसह मोठ्या प्रमाणावर बेस छापा टाकण्यात आला. गंगाखेड हे बेस स्टेशन बनवून पहाटे ५ ते संध्याकाळी ७ या वेळेत तपासणी मोहिम राबविण्यात आली. या अंतर्गत परभणी, पोखर्णी नरसिंहा आणि पूर्णा या स्थानकांवरून जाणाऱ्या गाड्यांमध्येही अचानक तपासण्या करण्यात आल्या.

या मोहिमेत एकूण १५ गाड्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये २६ तिकीट तपासनीस, २ वाणिज्य निरीक्षक आणि २ आरपीएफ कर्मचारी सहभागी होते. तपासणी दरम्यान ३९४ प्रकरणांमध्ये अनियमित प्रवास, तिकीट न भरणे व बुक न केलेल्या सामानाची आढळणी झाली असून १.४४ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ही'मोहीम नांदेड रेल्वे भागाअंतर्गत पूर्णा जंक्शन ते गंगाखेड रेल्वे स्थानक दरम्यान राबविण्यात आली. त्यामुळे प्रवाश्यांमध्ये खळबळ माजली आहे.

### प्रवाशांनी वैध तिकिटाने प्रवास करावा

ही मोहीम वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ. जे. विजय कृष्णा, सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक एन.एस. राव आणि श्रीनिवास सूर्यवंशी यांच्या देखरेखीखाली राबविण्यात आली. भारतीय रेल्वेच्या वतीने प्रवाशांनी नेहमी वैध तिकीटासह प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले असून सर्वांसाठी सुरक्षित व कायदेशीर प्रवास सुनिश्चित करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

---

# ठाकरे सेनेचे प्रभाग निरीक्षक जाहीर

प्रतिनिधी | नांदेड

आगामी महापालिका निवडणूक अनुषंगाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रभाग निहाय निरीक्षक शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने. शिवसेना नेते तथा विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे व उपनेते तथा संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांनी जाहीर केल्याची माहिती महानगर प्रमुख प्रकाश मारावार यांनी दिली.

नांदेड शहरातील प्रभाग निहाय निरीक्षक पुढील प्रमाणे

प्रभाग क्रमांक १. माधव कल्याणकर. विजय कल्याणकर. प्रभाग क्रमांक ३. आनंद जाधव. नितीन सरोदे. प्रभाग क्रमांक ४. प्रकाश मारावार, पिंटू सुनपे प्रभाग क्रमांक ६. महेश खेडकर. विजय बगाटे. प्रभाग क्रमांक ७. महेश खेडकर. विजय बगाटे. प्रभाग क्रमांक ९ . नवज्योतसिंग गाडीवाले. प्रभाग क्रमांक १०. आनंद जाधव. प्रभाग क्रमांक १४ . गजानन हरकरे. प्रभाग क्रमांक १६ . शैलेश रावत. अविनाश देशमुख. प्रभाग क्रमांक १७ . मनोज यादव. भय्या शर्मा. प्रभाग क्रमांक १९. श्याम जाधव. निळकंठ काळे. प्रभाग क्रमांक २० जितू टाक. साहेबराव मामीलवाड यांचा समावेश आहे.

### आलुर येथे धाडसी चोरी

प्रतिनिधी | देगलूर

तालुक्यातील मौजे आलुर येथे एका शेतकरी महिलेच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरात ठेवलेले नगदी दोन लाख व एक लाखाचे दागिने लंपास केल्याची घटना शनिवारी ता. २६ रोजी रात्री घडली.

आलुर येथील नजीरबी कालशसाब शेख ही विधवा महिला बाहेरगावी भावासोबत गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरात ठेवलेले दोन लाख रुपये नगदी व सोन्याचे दागिने लंपास केले.

# दोन दुचाकीची धडक एक ठार ; एक गंभीर जखमी

प्रतिनिधी | देगलूर

दोन दुचाकीची समोरासमोर धडक होऊन एक जण जागीच ठार झाल्याची घटना सोमवार दि.२८ जुलै रोजी रात्री १० च्या सुमारास देगलूर मदनुर रस्त्यावरील व्यंकटेश्वरा पेट्रोल पंपा समोर घडली . तर या अपघातात अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे

तेलंगणातील लमानी गोजेगाव येथील नागनाथ नारायण देशमुख (५०) यांचे शहरातील मौढा बाजारपेठेत बी बियाणे व औषधांचे दुकान आहे. ते सोमवारी रात्री आपले प्रतिष्ठान बंद करून लमानी गोजगाव कडे जात असताना देगलूर मदनुर रस्त्यावर तेलंगणातील मोठा सकरगा येथून शेख मसूद मेहबूब (३२ ) हे दुचाकी ( क्रमांक एम हेच २६ यु ८८७७ )देगलूर कडे येत होता. यावेळी दोन दुचाकीची समोरासमोर धडक होऊन नारायण देशमुख यांचा जागीच मृत्यू झाला तर शेख मकसूद मेहबूब याच्या उजव्या पायाचा पंजा तुटला आहे.

---

नवीन विद्युत मीटर बसवण्यास विरोध

# शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

प्रतिनिधी | मुदखेड



मुदखेड येथील महावितरण कार्यालय परिसरात आज दुपारी पार्डी वैजापूर येथील शेतकरी आनंदा कचरू मोरे यांनी विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली आहे.

अधिक माहिती अशी, की आनंदा मोरे हे अल्पभूधारक शेतकरी असून दोन एकर जमीन आहे. सध्या महावितरणकडून गावात नवीन मीटर बसविण्याचे काम सुरु आहे. या मीटरमुळे वीज ग्राहकांना जास्ती बिल येत असल्याच्या तक्रारी आहेत. याबाबत आपण महावितरण अधिकारी व कर्मचाऱ्यांना तोंडी सांगितले होते. परंतु, माझ्या सूचनेची त्यांनी दखल घेतली नाही, असे मोरे यांनी सांगितले. आनंदा मोरे यांनी विषारी औषध प्राशन केल्याचे दिसताच कार्यालयात उपस्थित असलेले अधिकारी आणि नागरिकांनी मुदखेड पोलिसांना याची माहिती दिली. बीड जमदार ठाकूर यांनी घटनास्थळी धाव घेत आनंदा मोरे यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांची अवस्था पाहून डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्यांना नांदेड येथे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची नोंद मुदखेड पोलीस ठाण्यात करण्यात आली.

दरम्यान, नवीन मीटर बसविण्याच्या मोहिमेवर भाजपाचे नेते बाळासाहेब देशमुख बारडकर यांनी महावितरणला लेखी निवेदन देऊन नवीन मीटर बसविण्याची सक्ती थांबवावी अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा नुकताच दिला होता. दरम्यान महावितरणच्या वतीने सद्या नवीन वीज मीटर देण्याची मोहीम सुरु आहे. मात्र या नवीन मीटरला शेतकऱ्यांसह सामान्य ग्राहकांमधून तीव्र विरोध दिसून येत आहे. त्यामुळे फतूर्तास नवीन वीज मीटर जोडणी थांबवावी.

---

निराधार आरोपांना कठोर भाषेत उत्तर-तिन्ही जिल्हा प्रमुखांचा इशारा

# शिवसेनेत पद विक्रीचा आरोप सपशेल खोटा

प्रतिनिधी | नांदेड

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात पैसे घेवून पदे विकली जात असल्याचा माजी जिल्हाप्रमुख प्रमोद उर्फ बंडू खेडकर यांचा आरोप सपशेल खोटा असून, अशा प्रकारच्या निराधार आरोपांना आता तितक्याच कठोर भाषेत उत्तर दिले जाईल, असा स्पष्ट इशारा पक्षाचे विद्यमान जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, ज्योतीबा खराटे आणि बबन बारसे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

गेल्या आठवड्यात पक्षाचे उपनेते व नांदेड संपर्कप्रमुख बबनराव थोरात हे जिल्हास्तरीय पक्ष मेळाव्यासाठी नांदेडमध्ये आले होते. त्यावेळी माजी जिल्हाप्रमुख बंडू खेडकर यांनी थोरात यांच्यावर पैसे घेऊन पदवाटप केल्याचा आरोप करत पत्रकारांपुढे काही विधानं केली होती. मात्र, त्या सर्व आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसून ते पूर्णपणे बनावट असल्याचे विद्यमान जिल्हा प्रमुखांनी सांगितले. पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, बबनराव थोरात यांनी कधीही कोणाकडून पदासाठी पैसे घेतले नाहीत. उलट गौरव कोटगीरे यांना नांदेड शहरप्रमुखपदी आणि बंडू खेडकर यांना जिल्हाप्रमुखपदी नियुक्त करण्यासाठी थोरात आणि इतर वरिष्ठ नेत्यांनीच शिफारस केली होती. आज जे आरोप केले जात आहेत, त्यावेळी पदांवर असताना मात्र असे कोणतेही आरोप केले गेले नव्हते. आता केवळ पद गेल्यामुळे आणि नैराश्यातून हे आरोप केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी भुजंग पाटील यांनी सांगितले की, बंडू खेडकर हे पक्षाच्या जीवावरच मोठे झाले आहेत. नगरसेवक, महापालिकेतील विरोधी पक्षनेते आणि जिल्हाप्रमुख अशी अनेक पदे त्यांना पक्षानेच दिली. पक्षासाठी काहीही योगदान न देता आता पक्षाविरोधात विधाने करणे, हे पक्षविघातक आहे. ''त्यांनी आम्हाला निष्ठेचा पाठ दिला नाही तरी चालेल,'' असा टोला पाटील यांनी लगावला.या पत्रकार परिषदेला जिल्ह्यातील अनेक वरिष्ठ पदाधिकारी, माजी सभापती, उपजिल्हाप्रमुख आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व शिवसैनिक पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून कार्य करत आहेत. पुढील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत विचारले असता, शिवसेना महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जाणार असल्याची माहिती देण्यात आली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील रणनीती ठरवली जाईल, असेही जिल्हा प्रमुखांनी स्पष्ट केले.या संपूर्ण प्रकरणावरून स्पष्ट झाले आहे की, पक्षातील अंतर्गत वादातून किंवा वैयक्तिक निराशेमधून आरोप केले जात असून, पक्षाच्या प्रतिष्ठेला धक्का देणाऱ्यांविरोधात कडक भूमिका घेतली जाईल. पक्षातील शिस्त आणि निष्ठा जपणे हीच आजची गरज असल्याचे जिल्हा नेत्यांनी ठामपणे सांगितले.

---

# ओमप्रकाश देवडा पीपल्स बँकेच्या मालाड पूर्व शाखेचा स्थलांतर सोहळा

प्रतिनिधी | नांदेड



महाराष्ट्रातील आग्रणी बँक ओमप्रकाश देवडा पीपल्स बँकेच्या मालाड पूर्व मुंबई येथील शाखेचे नवीन जागेत स्थलांतर करण्यात आले असून बँकेच्या सभासद, खातेदार, ठेवीदार आणि ग्राहकांच्या सुविधा लक्षात घेवून आता ही बँक नवीन प्रशस्थ जागेत शॉप नं.४ भानू ज्योती पो.ऑफ हौसिंग सोसायटी मालाडपूर्व मुंबई येथे स्थलांतरित करण्यात आली आहे.

बँकेचा हा स्थलांतर सोहळा २६ जुलै रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा प्राप्त हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ.हेमंत पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून एनएए फसीयुडी नवी दिल्लीचे उपाध्यक्ष मिलिंद काळे, बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनिल देवडा, कॉसमॉस बँकेचे उपाध्यक्ष प्रल्हाद कोकरे, सहकार भारतीचे प्रदेशाध्यक्ष श्रीराम चाळके, भाजपा मुंबई प्रवक्ता विनोद शेलार, चॅरीटी कमिश्नर रविंद्र धायतडक , अपेक्ष बँकेचे संजीव खडके, गोदावरी नागरी पतसंस्थेच्या अध्यक्षा राजश्री पाटील, बँकींग तज्ज्ञ प्रवीण गांधी, अकोला येथील रेणू कार्पोरेशनचे वैभव वानखेडे, बँकेचे संचालक शशीकांत दोडल, गजाननराव देशमुख, विजय अग्रवाल, अजित बज, सीए राजेश कयाल, मालाड शाखेचे सल्लागार मंडळाचे अध्यक्ष पंकज शाह, रतन पोद्दार, रमेश देवडा, शैलेश दालमिया, प्रेमप्रकाश केशवाणी, सीए यश बुबना, प्रफुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे, सरव्यवस्थापक शशीकांत कंदी, समता अग्रवाल, उपसर व्यवस्थापक सुधीर मुळे, शाखा व्यवस्थापक सचिन मोगरकर आदी उपस्थित होते.

---

**निषेध** सामाजिक कार्यकर्त्यांचे अनोखे आंदोलन चर्चेत

# गुटखा माफियांविरोधात गुटख्याच्या वेशात लढा

प्रतिनिधी | देगलूर



### तर.... उपोषण सुरुच ठेवण्याचा निर्धार

''गुटखा हा जनतेच्या आरोग्याशी थेट संबंधित विषय आहे. सरकारने त्यावर बंदी घातली असतानाही जर तो खुलेआम विकला जात असेल, तर ही गंभीर बाब आहे. संबंधित यंत्रणांनी जबाबदारीने काम न केल्यास समाजात गैरवर्तनास प्रोत्साहन मिळते.'' त्यांनी हेही स्पष्ट केले की, जोपर्यंत प्रशासन गुटखा विक्रीवर ठोस कारवाई करत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नसल्याचा इशारा आकाश कोकणे यांनी दिला आहे.सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आणणाऱ्या गुटख्याविरोधात ठोस कारवाई होईलच अशी आशा कोकणे बाळगुन आहेत.

शासनाने बंदी घातलेला गुटखा खुलेआम विकला जात असल्याच्या निषेधार्थ देगलूरमध्ये एका सामाजिक कार्यकर्त्याने केलेले अनोखे आंदोलन सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. निपाणी सावरगाव येथील आकाश दत्ता पाटील कोकणे यांनी थेट गुटख्याचा वेश परिधान करून देगलूर उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर २८ जुलैपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

राज्य शासनाने गुटख्याच्या उत्पादन, साठवणूक, विक्री आणि वाहतुकीवर सक्त बंदी घातली असतानाही देगलूर तालुक्यातील पानटपऱ्या, हॉटेल्स, किराणा दुकाने यांमध्ये गुटख्याची सर्रास विक्री सुरू आहे. हा व्यवसाय काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या सहकार्याने गुटखा माफियांच्या संगनमताने चालत असल्याचा आरोप कोकणे यांनी केला आहे. त्यांनी याविरोधात यापूर्वीही जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, अन्न व औषध प्रशासन आणि उपजिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदने देत वेळोवेळी तक्रार नोंदवली होती. मात्र, कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने त्यांनी आंदोलनाचा मार्ग पत्करला.१४ किलोमीटर अंतर पायी चालत आल्यावर देगलूर उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांनी उपोषण सुरू केले. विशेष म्हणजे, त्यांनी आपल्या अंगावर गुटख्याचे विविध ब्रँड दर्शवणारा ड्रेस परिधान केला असून, त्यामध्ये खऱ्या गुटख्याचे रेपर, ब्रँड चिन्हे आणि आकर्षक रंगांचा वापर करण्यात आला आहे. त्यांच्या या वेगळ्या वेशभूषेमुळे आंदोलनाला स्थानिक नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. शहरातही त्यांच्या या उपक्रमाची मोठी चर्चा असून, अनेक नागरिक त्यांच्याशी संवाद साधत पाठिंबा दर्शवत आहेत.''गुटखा हा जनतेच्या आरोग्याशी थेट संबंधित विषय आहे. सरकारने त्यावर बंदी घातली असतानाही जर तो खुलेआम विकला जात असेल, तर ही गंभीर बाब आहे. संबंधित यंत्रणांनी जबाबदारीने काम न केल्यास समाजात गैरवर्तनास प्रोत्साहन मिळते, प्रशासनाने गुटखा विक्रीवर ठोस कारवाई करावी.

---

रिल्सचं वेड: तरुणांपासून प्रौढांपर्यंत

# झोपेचा ऱ्हास, मेंदूविकाराची भीती

प्रतिनिधी | नांदेड

डिजिटल युगात स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा वापर वाढला असून काही सेकंदांचे रील्स पाहणे आता करमणूक न राहता व्यसन बनत आहे. लहानांपासून प्रौढांपर्यंत ही सवय झोपेवर आणि मेंदूवर परिणाम करत आहे, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

मोबाईलच्या स्क्रीनवर तासन्तास डोळे लावल्याने झोपेची गडबड होते. झोप ही मेंदूच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक असून ती अपुरी राहिल्यास कार्यक्षमता, स्मरणशक्ती, मानसिक स्थैर्य यावर परिणाम होतो. काही प्रकरणांमध्ये तर न्यूरॉन्सवर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे.पूर्वी सोशल मीडिया तरुणांपुरता मर्यादित होता. पण आता ३०५० वयोगटातले लोकदेखील रील्सच्या आहारी गेलेत. तणावातून विरंगुळा शोधताना रात्रभर मोबाईल पाहणे झोपेचा ऱ्हास घडवते. परिणामी, थकवा, चिडचिड, चक्कर, लक्ष न लागणे अशा लक्षणांमध्ये वाढ झाली आहे.तज्ज्ञ सांगतात, झोप म्हणजे मेंदूसाठी ऑक्सिजन. ती अपुरी राहिल्यास मानसिक व न्यूरोलॉजिकल विकार संभवतात. शाळकरी मुले रील्समध्ये गुंतली असून पालकही मोबाइलमध्ये मग्न असल्याने कुटुंबातील संवाद कमी झाला आहे.

उपाय म्हणून मोबाईल वापरावर मर्यादा, झोपेचे नियोजन आणि डिजिटल शिस्त अंगीकारणं गरजेचं आहे. अन्यथा आभासी करमणुकीच्या मोहात मेंदूचं आरोग्य कायमचं हरवू शकतं.